
# कार्तिक हजारे



# पेरजागढ... एक रहस्य भाग २

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पेरजागढ... एक रहस्य

## भाग २

लेखक

कार्तिक गुलाब हजारे

# पेरजागढ... एक रहस्य भाग २

## लेखक... कार्तिक गुलाब हजारे

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२

व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com

फेसबुक... https//www.facebook.com... karthik hajare

पत्ता.. मातामाय चौक, सिमेंट रोड, वार्ड क्र. ३...

मु. मिंथूर, पोस्ट: नवेगाव( पांडव), तालुका: नागभिड, जिल्हा: चंद्रपूर.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २८ ऑक्टोबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.



वाचनाची आवड मला तशी लहानपणा- पासूनच होती. शाळेतही असताना अगदी एक कथाकार म्हणून माझी वेगळीच ख्याती होती. एखाद्या कल्पनेत आपण काय काय रचु शकतो? याची प्रचिती मला सुखदेवे सर नेहमी द्यायचे. अस्खलित प्रतिसादाने शाळेतील कित्येक संस्कृतिक भागात माझी आवर्जून निवड व्हायची. पण कालांतराने आर्थिक परिस्थिती मुळे माझी शाळा सुटली आणि अंगावर कर्तेपणाचा ओझा आला.

पण आवड कधीच मिटली नाही. वृत्तपत्रांत मी झळकत राहिलो.

कालांतराने तेही बंद झाले. कारण कामाच्या व्यापात मी अडकत राहिलो. पण सवयी प्रमाणे वि. स. खांडेकर, सुहास शिरवळकर अशा बऱ्याच लेखकांच्या पुस्तिका मी वाचून काढायचो. त्यातून माझ्यातल्या कलाकाराचा एक नवीन जन्म व्हायचा. आणि मी परत शुरुवात केली. "कुणाच्यातरी आठवणीत" ही माझी पहिली कविता. जी आजही बेधुंद लहरी माध्यमावर झळकते आहे.


पुढे कथा, कविता, लेख, चारोळी असे बरेच प्रकार त्यात समावेश करू लागले. पण काहीतरी लिहायचं? हा प्रश्न मनातून जाईना. कादंबऱ्या वाचताना मी पात्रांची, भावनांची विचारसरणी व्यक्त करत गेलो. आणि नव्या जोमाने लिहायला लागलो.


शब्दांचा हा निरंतर प्रवास,
संपूच नये कधी...
आयुष्य जगुनी जावे,
शब्दांच्या परी..
असावे वळण आयुष्याला,
शब्दांच्या संगतीचे...
अगदी अश्रुसुद्धा गोठतात,
शब्दांच्या घरी...

लिहायला जितकी भीती वाटत नाही ना, एक प्रकारे ती भीती आपलं लिखाण दुसऱ्याकडे दिल्यावर वाटते. आपल्या भावना, आपले विचार त्यांना पटतील का? आपलं लिखाण त्यांना आवडेल का? पण केला प्रयत्न... आणि थोडाफार यशस्वी झालो. आणि आता त्याच थोड्याफार प्रयत्नाने लिहत आहे.

आपला
कार्तिक हजारे





कार्तिक हजारे यांची पुस्तके.

त्यांच्या या कव्हरवर क्लिक केल्यावर ते ते पुस्तक उघडेल.

वाचायलाच हवीत ही पुस्तकं. वाचून झाल्यावर कशी वाटली ते कळवा.

मोबाईल नंबर... ७०३८९५०७६२/ व्हॉट्सअँप नंबर... ९७६५३६७०५८

ईमेल.. www.karthikhajare@gmail.com



सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार,तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार....

नागभिड तालुक्यातील मिंथुर या छोट्याश्या गावातील रहिवासी "कार्तिक हजारे" हे आमचे मित्रच आहेत. घरी कुठलीही परंपरा नसताना केवळ प्राथमिक शाळेतून त्यांच्यावर झालेल्या संस्कारातून कथा ते कादंबरी असा प्रवास करतात. घरची परिस्थिती बेताची असताना सुद्धा त्यांचे प्रयत्न अगदी धैर्यशील असतात. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

पेरजागढ हे नागभिड पासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर स्थित सोनापूर या गावापाशी वसलेली प्रसिद्ध डोंगररांग आहे. ज्याला सात बहिणीचे डोंगर म्हणून पूर्ण महाराष्ट्र ओळखतो. या पेरजागढाच्या प्राचीन अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. तसेच गावागावात सुध्दा या दंतकथा पोचल्या आहेत. लेखकाने या गडाचा इतिहास कादंबरीच्या माध्यमातून रेखाटून तो सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले आहे.

पेरजागढ एक रहस्य ही गूढ कथा लेखकाने विशेष उदाहरणे घेत तसेच गवखेड्यात घडणाऱ्या घटना लक्षात घेत अतिशय सुंदरपणे रेखाटली आहे. आता पुढे काय होणार? ही भावना प्रत्येक वेळेस मनात घर करून राहते. आणि वाचनाची उत्कंठा वाढत जाते. प्रस्तुत कथेमध्ये पेरजागढविषयी अतिशय उपयुक्त माहिती दिली आहे. तसेच

आजूबाजूचा प्रदेश याची तंतोतंत मांडणी केली आहे. ही कथा रेखाटताना लेखकाने ऐतिहासिक,वैज्ञानिक तसेच भौगोलिदृष्ट्या विचार केला आहे. आणि तसेच रितू, पवन आणि त्याचे मित्रमंडळी,इन्स्पेक्टर राठोड यांचे पात्र आणि त्याभोवती असलेली कथा कादंबरीचा दर्जा उंचावते. प्रस्तुत कथेत असलेली रंजक उदाहरणे,गडावरील वातावरण आणि जनावरे यांच्याविषयीचे लेखन पुन्हा त्यात तेज निर्माण करते.

लेखक गडाचे नियम समजावून सांगताना लिहितात की गडावर ज्या सात बहिणी लुप्त पावलेल्या होत्या त्या अविवाहित होत्या. त्यामुळे हळद लागलेली नवविवाहित मुलं यांचा सहवास गडाला भावात नाही. मासिक पाळी असलेल्या किंवा दारू,मांस सेवन केलेल्यांना हे असलं काही तिथे चालत नाही. ते जंगल त्यांना खायला उठतो.

अशा विविध गोष्टी या कादंबरीत आलेल्या असून त्यासोबतच गडाचा इतिहास सुद्धा आलेला आहे. एका रहस्यमय कादंबरीला ज्या प्रकारची पटकथा आवश्यक असते ती लेखकाने यात मांडली आहे.

"पेरजागढ- एका रहस्य... भाग 2" हे सर्वांना आवडेल यात तिळमात्र शंका नाही. लेखकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!!!

समीर श्रिधरराव भोयर...
(शिक्षक)

## अभिप्राय... दुर्गा सुरेश जराते

सर्वप्रथम वाचकांना माझा नमस्कार. तसेच ई साहित्य वरील सर्व मान्यवरांना माझा सस्नेह नमस्कार...

ई साहित्यवरील मीसुद्धा एक वाचकच आहे. आणि बऱ्याच पुस्तिका वाचत असते. जे डोळ्यांनी बघतो ते खरं मानणाऱ्यापैकी मी एक आहेच. परंतु जे बघता येत नाही, ते डोळ्यांदेखत असते असे सत्व मान्य करणारे बरेच कमी आहेत. "पेरजागढ... एक रहस्य" ही एक रहस्यमय कथा, लेखकाने खूप छानपणे रेखाटली आहे.

मला वाचत असताना जी उत्कंठा लागली होती, की आता पुढे काय होणार? काय घडलं असेल नेमकं? काय वळण घेईल प्रकरण? या प्रश्नार्थक साखळीने गुंतवणूक करून ठेवण्यात लेखक नक्कीच यशस्वी झाले आहेत.

प्रस्तुत कथेमध्ये लेखकाने पवन आणि रितूची लव्हस्टोरी, पवन - आईचं प्रेम, अमर -प्रदीप -नमन - सदू यांच्याशी असलेली मैत्री. आणि या सगळ्या पात्रांना एकवटून एक रहस्य गुंतवलेले आहे. मृत्यूचं... शेवटी जेव्हा नमनने ती थैली पवनला दिली. तेव्हा वाटलं की, काय तो

मार्ग निघेल? परंतु लेखकाने जो सस्पेन्स ठेवला आहे. तो फारच अप्रतिम आहे. जे वाचकांना सुद्धा नक्कीच आवडेल.

ई साहित्य वरील लेखकाचे "प्रेमाचे अस्तित्व", "काही राहून गेलं होतं" आणि "मुक्ती" या कथांच्या माध्यमातून त्यांनी त्यांचं जे उत्तम लिखाण सादर केलंय. ते खरंच विचार करायला लावणारे आहेत. आणि मलाही ते वाचायला आवडलेच.

मला नक्कीच आशा आहे की, सत्य आणि सत्वाच्या पलीकडे असलेली ही रहस्यमय कथा. नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. आणि अश्याच पद्धतीने लेखकाने लेखन करावे ही आम्हा वाचकांकडून त्यांना शुभेच्छा...

दुर्गा सुरेश जराते.

ब्रम्हपुरी.

सत्य आणि सत्वाच्या वाटचालीवर पाऊल टाकताना, आम्ही खूप दूर आलोय याची सारखी प्रचिती येत होती. पण सगळ्या गोष्टींना गृहीत धरून थोड्याफार कल्पनेने रेखाटलेली ही भटकंती बुद्धिमत्ता, देवत्वाबद्दल असणारी श्रद्धा, गडाविषयी अतोनात प्रेम, नैसर्गिक महत्त्व आणि ऐतिहासिक असा जपलेला ठेवा. हे सगळं यात वर्गीकरण करण्यात आलं आहे. कित्येकदा वाघाची डरकाळी, अस्वलाचं गुरगुरणं आणि सापांचं सरपटणं अश्या बऱ्याच भयावह गोष्टींना आम्ही सामोरी गेलो.

कित्येक रहस्यांचा उलगडा करताना हृदयाची स्पंदने वाढून जायची. पण आज या प्रवासाला इतक्या चांगल्या पद्धतीने रंगवताना, मी कधीच बघितले नव्हते. इतर प्रवासासारखा हाही प्रवास काही क्षण चित्रांचा राहील असं मला वाटलं होतं. पण लेखकाने मनोरंजन, सत्वाचं अध्ययन आणि स्थळांची उलाढाल अश्या सगळ्या गोष्टींची पूर्तता अगदी तंतोतंत केली. ज्यामुळे हा प्रवास या पुस्तकाद्वारे आयुष्यातला एक अविस्मरणीय प्रसंग म्हणून डोळ्यासमोर ठेवला. त्याबद्दल मी लेखकाचे आभार मानतो. आणि त्यांच्या "पेरजागढ... एक रहस्य" या पहिल्या भागाला अनुसरून, पुढच्या भागासाठी शुभेच्छा प्रदान करतो.

पंकज माकोडे, नागपूर

नमस्कार...

वाचकांनी माझ्या तीनही पुस्तकांना बहुमतांनी अभिप्राय देऊन ही कादंबरी लिहून घेण्यास मला प्रवृत्त केले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आणि बऱ्याच वाचकांच्या अपेक्षा लक्षात ठेवून, काहींच्या सुचना अगदी निदर्शनास ठेवून काहींची मदतही अंगीकारून इतर पुस्तकांचा संचपण, आपल्याला लवकरच मिळेल अशी मी खात्री बाळगतो. आणि सगळयांना गृहीत धरूनच लॉकडाऊनच्या काळात मी या कादंबरीची निर्मिती केली.

पेरजागढ हे एक ग्रामीण भागातील सात बहिणींचं गढ म्हणून ओळखण्यात येते. नागभिडवरून बारा किलोमीटर स्थित असलेल्या सोनापुर या गावापाशी ते वसले आहे. त्या गडाबद्दल बऱ्याच काही आख्यायिका आहे, ज्या मला शोधून काढायच्या होत्या. त्या एकाच पर्वतरांगेला ठिकठिकाणी दैवतांचा वास लाभलेला होता. मात्र सगळयांची आख्यायिका मात्र वेगळी. आणि बऱ्याच प्रमाणात असलेला ऐतिहासिकतेचा वारसा काही शोधाअंती आढळलेला होता. त्यामुळे मी एक टीम ठरवली आणि आम्ही त्या पर्वत रांगेचा प्रत्येक बाजूने अभ्यास करायचा ठरवला. कित्येक भयावह गोष्टींना सामोरी जात, त्यातले तथ्य अनुसरत, बऱ्याच गोष्टी आमच्या लक्ष्यात आल्या

होत्या. "भाऊ हसते म्हणून त्याचं गड घसरते, आणि बहीण रडते तर तिचं गड चढते" ही पेरजागडाची एक पूर्वापार आख्यायिका होती. नेमकं त्या ओळीत काय दडलंय? त्याचं शोध घेण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला. आणि अपेक्षेप्रमाणेच बरंच काही ऐकायला मिळालं?

इतिहास घडवण्यासाठी एक प्रसंगही किती महत्त्वाचा ठरतो याची जाणीव आम्हांस आली. सदर भागामध्ये फक्त त्याची शुरुवात झाली आहे. त्यामुळे वाचकांना कित्येकदा वाटेल की, प्रस्तुत कहाणी पेरजागडाशी संबंध तोडू पाहते आहे. पण त्याची शुरुवात हीच पेरजागडापासून कितीतरी लांबणीवर झाली होती. सदर कथेमध्ये मी प्रवासाचा वर्णन, तिथे असलेल्या लोकांची मते आणि काही सोशल मीडियाचा वापर केला आहे. ज्यामुळे लिहिताना काही खऱ्या गोष्टींची सुद्धा नोंद झाली आहे.

लिहिण्याचा माझा हा एक प्रयत्न होता की, सध्या फॉरेस्टच्या मर्यादेचे पालन करता, अशी बरीच देवस्थाने त्या जंगलामध्ये विलीन होत आहेत. पेरजागड हे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. हे लाखो पर्यटकांना माहीतच असेल. आणि गडाची शान फक्त गडच असते त्याचं आवार नाही. पण जेव्हा गडच नसेल तर इतरांच्या श्रद्धेचा काय होणार? हा एक प्रश्न सुद्धा मनाला सतावत होताच.

इतर पुस्तिका लिहिताना फक्त कल्पना डोळ्यासमोर होत्या. पण पेरजागड लिहिताना सारखा एक आभास कानाशी गुंजत होता.


डोळ्यांसमोर असलेलं सत्य आणि डोळ्यांदेखत असलेलं सत्व ह्या दोनच गोष्टी तेव्हा मायने करत होत्या.

इ साहित्याच्या चालू असलेल्या घडामोडीला माझा नेहमीच हातभार असेल. त्यामुळे मी श्री. सुनील सामंत आणि ई साहित्य टीमचं अभर व्यक्त करतो. आणि खास वाचकांच्या आग्रहास्तव सादर करतो...

" पेरजागड... एक रहस्य"

भाग... 2

कार्तिक हजारे



"बाबलाई" हे एक एकाष्म स्मारक आहे.ज्याला आद्य देवतेची उपाधी दिल्या गेली आहे.

# महापाषाणयुगीन संस्कृती (Megalithic Culture)

महापाषाणयुगाला (Megalithic) महाश्मयुगीन व बृहदश्मयुगीन या नावानेही ओळखले जाते. हे नाव त्यांच्या ओबडधोबड शिळांची रचना करून स्मारकं उभारण्याच्या पद्धतीमुळे मिळाले. मानवी सांस्कृतिक इतिहासात महापाषाणयुग वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाचे ठरलेले आहे.

त्याचं कारण म्हणजे या संस्कृतीचे अवशेष जगात जवळपास सर्वत्र मिळतात आणि महापाषाणयुगीन दफन पद्धतीशी संलग्न असलेल्या काही प्रथा आताही मोजक्या ठिकाणी प्रचलित आहेत.

अजूनही काही ठिकाणी सुरू आहे ही प्रथा

गडचिरोलीतील काही भागात माडिया समाजात तसेच छत्तीसगड, झारखंडमधील मुंडा, संथाल अश्या काही समुदायांमध्ये या प्रकारच्या दफनपद्धती अजूनही अस्तित्वात आहेत.

जिथे आजही लोकं मृतव्यक्तींच्या आठवणीमध्ये दगडांची, लाकडांची स्मारकं उभारतात. जर आजच्या संदर्भात पाहायचं झालं तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींचे 'शक्तीस्थल' स्मारक हे सुध्दा एकाश्म स्मारकाचं प्रतीक आहे. हुतात्मा व अमर जवांनाच्या स्मरणार्थ सुद्धा अश्याच प्रकारचा प्रतीकात्मक शिलास्तंभ उभारला जातो.






प्राचीन पाच पांडव गुंफेपासून जवळपास ८०० मीटरच्या अंतरावर शिकारदेव म्हणून हे दैवत वसले आहे.इथे जवळपास ५०० एकाष्म आहेत अशी नोंद केली गेली आहे.तिथल्याच एका स्मारकासोबत उभे असलेले कार्तिक हजारे.

अर्पण पत्रिका

सदर कथा सर्व ज्ञात आणि अज्ञात रसिकांना समर्पित,

तसेच वेळोवेळी मदत करणाऱ्या माझ्या सर्व मित्रमैत्रिणीस समर्पित...

# ९)मृत्यूची आणि नमनची गाठ....

(पूर्ववत... )

घरी जाताना आटो पकडली. आणि थैली विसरली की काय?म्हणून सतत त्यावर माझी लक्ष जात होती. कितीतरी दिवसानंतर आज माझ्या चेहऱ्यावर असणारा उदय खरच चित्रफितामध्ये टिपण्यासारखा होता. असं वाटत होतं की ही वेळ केव्हा जाते? आणि केव्हा घरी जाऊन मी ती थैली उघडून बघतो? उत्सुकता माझी शिगेला पोहोचली होती.

पण इकडे मात्र काही वेगळेच वारे वाहू लागले होते. नमनला त्या गोष्टीचा पूर्वाभास केव्हाच झाला होता. पण जसं घरच्यांपासून त्याने लपवलं होतं. तसंच ती गोष्ट त्याने माझ्यापासून देखील लपवली होती. दोन दिवस त्याने ते चाबकाचे फटके स्विकारले होते. पण मी त्याला सामोरी भेटलो असूनसुद्धा त्याने मला त्या गोष्टी शब्दानेही मला सांगितल्या नव्हत्या.

त्याच्याबद्दल मी जितके आदर करावे तितकेच मला कमी वाटत होते. त्याने स्वतःच्या प्रत्येक गोष्टीत हळवेपणा केला होता.

की कुणालाच त्याची जाणीवसुद्धा होऊ दिली नाही. स्वतःला आईवडिलांपासून लपवलं ,स्वतःच्या प्रेमाला स्वतःच्या अस्तित्वामागे दडवलं, आणि आज मृत्यूची इतकी मोठी लहर त्याच्या अंगावर येऊन ठेपली होती, तरी त्याने हसतमुख करून स्वतःच्या मैत्री मागे लपवलं. आता खरंच सांगा... त्या मित्राला काय म्हणू मी? कृतघ्न की कृतज्ञ?त्याला रागाने बोलू की प्रेमाने समजावून जवळ घेऊ.

त्या दिवशी त्याला फार प्रमाणात उष्ण वाटू लागले होते. जसं कुणी लाल गडद असलेल्या निखाऱ्यावर त्याला लटकवलं असून त्याची कातडी कुणीतरी सोलू बघत आहे. तो घाबरला होता, इतका की फार प्रमाणात. त्याला सुचत नव्हते की काय करावं?खोलीतल्या खोलीत इकडे तिकडे चकरा मारू लागला होता. उष्णतेमुळे त्याचे पाय बाथरूमच्या टपाकडे वळले. त्यातले पाणी हाताची बोटे पण सुकडून जावीत इतके थंड होते. तो त्या टपामध्ये जाऊन बसला.

पण हे काय? हातापायाची बोटे गोठून बर्फ व्हावी असा तो थंडगार पाणी क्षणातच गरम होऊ लागला. त्याच्या वाफा निघू लागल्या होत्या. काही वेळातच ते इतकं कळतं झालं की त्याचे

चटके नमनला परत त्रास देऊ लागले होते. काय घडतंय माझ्याशी? असं म्हणून त्याने जवळ असलेल्या मोबाईलला हातात पकडण्यासाठी हात समोर केले, तर मोबाईल चालू होईना. हे काय घडत आहे?हे त्याच्या लक्षात आले होते. क्षणातच मला वाचव ..... पवन..... पवन ... त्याच्या मुखातून हाका निघू लागल्या. त्याला सहन होऊ शकत नाही असे गरम गरम वारे त्या खोलीत वाहू लागले होते.

कसंतरी विव्हळत तो हॉलमध्ये आला. जमिनीवर इकडे तिकडे घरंगळू लागला होता. आतमधल्या दारातून एक पुसटशी काळी सावली त्याला त्याच्याकडे येतांना दिसत होती. चट चट असा चाबकाचा आवाज त्याच्या कानाशी गुंजत होता. आता नमनला कळून चुकलं होतं. आतापर्यंत आपण ज्याची चर्चा फक्त चालू केली होती आज तो मृत्यूदेव त्याच्या दारात उभा होता. अचानक एक भयानक हसण्याचा आवाज त्याच्या कानाशी आला. अंगात वाढत असलेल्या उष्णतेमुळे घाम सुद्धा येत नव्हता. पण त्या सावलीला बघून नमनला मात्र वाटत होते, की आता त्याचा मृत्यू फार काही लांब नाही.

मुखातून त्याला वाचविण्याचे ध्वनि आता त्याला साथ देणार नाही, हे त्याला कळले होते. चट चट दोन वार त्याच्या पाठीवर पडली. चाबका सरशी त्याच्या पाठीवर असणारे कपडे फाटून गेले होते. त्याची पाठ अशी उघडपणे सामोरी आली होती. रक्ताचे थेंब वळातून ओघळू लागले होते. नमन आता वेदनेने जोरजोरात विव्हळू लागला होता. त्याचे कर्कश आवाज कानठळया बसवणारे होते. चट चट असे चाबकाचे वार वारंवार होऊ लागले होते. रक्ताचे असे ओघळ वाहू लागले होते.

नमनला त्याचा जीव वाचवण्यासाठी समोर कोणताच पर्याय दिसत नव्हता. मला वाचवा ... असं करुण स्वर नरम आवाजात ऐकायला येत होते. पण एक गोष्ट नमनला दिसली आणि थोडाफार हर्ष त्याला दाटून आला. कारण समोर बाहेरचा दरवाजा उघडा पडलेला त्याला दिसला आणि त्याने क्षणाचाही विलंब न करता दरवाज्यावर धाव घेतली. मागून क्रूर भयानक हास्य ऐकायला येत होते नमनला, पण आता चिंता नव्हती. तो सुसाट वाट मिळेल तिकडे पळू लागला होता. त्याला दिशेचं भान नव्हतं की वाटेचं. फक्त जीवनाला वाचवण्यासाठी आयुष्याची ती केविलवाणी धडपड मात्र उमगत होती. पळता पळता तो हायवेवर निघून आला होता.

पण शेवटी मृत्यूच तो! आजपर्यंत त्यापासून कोणी वाचू शकला नाही. आणि आपण तर त्याच्यासमोर काही शूद्र जीव होतो. नमनला काही क्षणासाठी वाटले की आता त्याचे प्राण वाचले असतील. पण रेड्याचं हंबरनं त्याला स्पष्ट ऐकू आलं आणि परात भीतीचे सावट त्याच्या शरीरावर जमा झाले. त्याने क्षणभर मागे वळून बघितलं.

काही वेळापूर्वी असलेली ती पुसटशी आकृती एका रेड्यावर बसून येत होती. आणि भयानक ते क्रूर हास्य आसमंत गर्जवत जीवाची धमकी देत होते. पण एक होतं, हायवे म्हटल्यावर कितीतरी भरधाव गाड्या रस्त्याने चालत होत्या. एव्हाना नमनचं रक्ताने लाल झालेल शरीर बघून हायवेवरुन कितीतरी लोक थांबून जात होती. कारण मृत्यूदेव तो!!! कुणालाच दिसत नव्हता. आणि कोणतीही गाडीपण त्याला अडवू शकत नव्हती. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे तो नमनशिवाय कुणाला दिसू शकत पण नव्हता.

कसं असतं! माणूस हा असा प्राणी आहे, की जीव वाचवण्यासाठी तो अगदी कुठल्याही थराला जाऊ शकतो. हे आपल्याला ठाऊकच आहे. आणि फक्त माणसाच्या बाबतीत नाही

तर इतर कोणत्याही सजीवात ते साम्य आढळते. कारण धडपडच संकटात माणसाचा खरा सोबती असतो. धडपड कधीही माणसाला नवीन मार्ग दाखवते. पण ही धडपड नमनची शेवटची धडपड झाली होती.

धावता-धावता शेवटी तो धावणार तरी किती? समोर चौरस्ता आला आणि दमलेला नमन तिथे येऊन थांबला. आता त्याला जाणीव झाली होती की तो कितीही धावेल तरी काळाच्या समोर तो धावू शकत नव्हता. आणि एक विचार करून त्याने आपली प्रतिमा मागे केली. कदाचित प्राणाची भीक मागावी असा त्याचा हेतू असावा. पण ती भिक तरी तो कुणाला मागत होता. ज्याला फक्त प्राण घेण्याचे काम होते. तो तिथेच धापा टाकत उभा राहिला. मघाशी असलेली ती काळी आकृती भयावह असा आवाज करून रेड्यावर किंकाळत त्याच्या जवळ येऊन ठेपली. आणि परत एकदा त्याच्या भयावह हसण्याने आसमंत गरजले.

चौराह्यावर लोकांची गर्दी उमडू लागली होती. पण सगळ्यांच्या मनात एकच प्रश्नचिन्ह चेहऱ्यावर दिसत होता. येणारा प्रत्येक जण त्याही वेळेस अचंभित होऊन हे सगळं बघत होता. कुणालाच कळत नव्हते की शेवटी हे काय घडत आहे?आणि नमन

छिन्न विच्छिन्न अवस्थेत तिथे उभा होता. त्याला भय तरी कुणाचं होतं?कुणाला बघून तो इतका पळत होता. चेहऱ्यावर असलेले भाव एवढे चित्तथरारक होते, की तिथे असणारा प्रत्येक जण प्रतिद्वंदाला आडवा गेला असता. पण कोण आहे?जो कुणालाच दिसत पण नव्हता.

परत एकदा भयानक अशी किंकाळी त्या नमनच्या कानावर आली. पण या वेळेस त्याच्या चेहऱ्यावर भीती नव्हती. कारण इतक्यात त्याने मृत्यूला जाणून घेतलं होतं. मृत्यूदेव त्याच्या भोवताल प्रदक्षिणा घेत त्याला न्याहाळू लागला होता. आणि चाबकाचे फटकार त्याच्या शरीरावर बसू लागले. शरीरावर जागोजागी वळ येऊ लागले. रक्ताच्या धारा ओघळू लागल्या होत्या. आणि हे सगळं भरचौकात शहराच्या मुख्य रस्त्यावर घडत होते.

कित्येक लोक घाबरून बेशुद्ध पडून जात होते. आपल्यासमोर कोणाचा जीव जात आहे हे कित्येकांसाठी हृदय हेलावणारे प्रसंग होते. त्याची ती आर्त हाक कित्येकांचे डोळे पाणावणारी होती. कित्येक लोक उत्साहाने ते सगळं स्वतःच्या मोबाईलमध्ये शूट करत होते. भरल्या चौकात हा विचित्र व भयानक असा प्रसंग

कितीतरी वेळ चालत होता. जिकडेतिकडे लाल रंगाचे ठिपके सड्याप्रमाणे ओघळू लागले होते. हृदय विदीर्ण व्हावे असा तो प्रसंग कित्येकांच्या डोळयांत साठला होता.

शेवटी काही वेळाने होतं नव्हतं ते सगळे त्राण नमनच्या देहातून संपलं होतं. आणि तो वसुधेच्या पाठीवर धारातीर्थी कोसळला. अंतिमप्रसंगी त्या भयानक मृत्यूने त्याच्या प्राणावर विळखा घातला होता. हळूहळू त्याची पापणी मिटत चालली होती. उजेडाचा साम्राज्य मिटवून त्याने काळोखात प्रवेश केला होता. तो आवाज, तो करुण ध्वनि केव्हाच बंद झाला होता. उरला होता तिथे फक्त एक देह,हाडामासाचा देह. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला एक निर्जीव देह. काय झालं?माहिती नाही. कुणी मारलं? तर माहिती नाही. आणि कसं मारलं?तर तेही माहिती नाही. इतक्या लोकांच्या उपस्थितीत त्याचा असा तडफडत जीव गेला पण कुणाला काही कळलं काय?तर काहीच नाही.

इतकं सगळं झालं,तरी तो मरूनही त्याचं ते प्रेत त्या उघड्या रस्त्यावर पडलं होतं. आणि बघणाऱ्यांची गर्दी मात्र वाढतच होती. एखादा जीव तोडून कसरत करतो आहे त्याची कला दाखवतो आहे. त्या सारखं लोक घोळक्याने तिथे उभे राहात होते. ट्राफिक

केव्हापासून जाम होऊन गेलं होतं. आतापर्यंत घडत असलेल्या कृत्याचं ते व्हिडिओ, केव्हाच वायरल झालं होतं. पण कुणीही नमनपाशी जाण्याचे साहस करत नव्हते. जिकडे तिकडे उडालेला रक्तपात आणि त्यात पडलेला नमनचा देह!!!

किती वेळ ही गर्दी होणार होती?शेवटी जिकडेतिकडे ही गोष्ट वायरल झाली. आणि येत्या एक तासात जिकडून तिकडून गाड्या जमा झाल्या. काही वेळातच घटनास्थळी दाखल झालेल्या ॲम्बुलन्स मधून दोन माणसे उतरली. त्यांनी नमनला उचललं आणि गाडीत टाकून निघून गेली. पोलिसांनी त्या जागेवर सील लावली, आणि तेवढ्या जागेची रहदारी बंद करून ते आपल्या पुढील कामास लागले.

## १०) पवनची आणि इन्स्पेक्टर राठोडची गाठ...

मला या गोष्टीची पूर्वकल्पना आलीच नाही. ऑटोतून उतरल्यावर मी सगळयात आधी घरी आलो आणि ती थैली व्यवस्थित कपाटात ठेवून आधी आंघोळीला गेलो. मठात विभूतीचा कसला ना कसला अंगारा अंगास येऊन चिकटलेला होता. ज्यामुळे मला कसंतरी वाटायला लागले होते. माझी रूम म्हणजे स्पेशल अशी बाजूला होती. मला विचारल्याशिवाय घरचे सुद्धा त्यात प्रवेश करत नव्हते. आणि माझं अस्तित्व म्हणजे ती माझी रूम माझं अभ्यास करण्यापासून माझं मनन, चिंतन, शोकसभा त्या रूममध्येच व्हायची. त्यामुळे एकाच घरात दोन तुकडे या प्रमाणे माझं होतं. शिवाय मला बहीण अशी नव्हतीच ज्यामुळे कोणी मला भावनांची देवाणघेवाण केलं असतं. आई वडील होते पण ते सुद्धा स्वतःच्या कामात असत.

वडील कॉलेजात प्राध्यापक होते. त्यामुळे ते गेले की संध्याकाळीच परत यायचे. आणि आई असायची ती सतत

शेजारच्या काकूंकडे गप्पा मारत किंवा घरच्या टीव्हीवर सिरीयल बघत राहायची. त्यामुळे माझ्या बाबतीत निर्णय घ्यायचा हक्क तर दोघांनाही होता पण वेळ मात्र कुणालाच नव्हती. एखादी गोष्ट लागली तर सादर करायचं आणि निर्णय घ्यायचा. ज्यामुळे मला कधी घरच्यांना काही सांगावसं वाटलंच नाही. आणि इतक्यात मी घरच्यांशी फारसा काही बोलत पण नव्हतो. पण त्यांनी तेवढ्यापुरती मला विचारलं होतं आणि तेवढ्यापुरतेच मी पण त्यांना सांगितलं होतं. म्हणून घरच्यांशी आता काही बोलण्याचा प्रश्नही नव्हता.

आंघोळ करून आल्यावर मी सगळ्यात आधी ती थैली कपाटातून बाहेर काढली आणि तिला खोलण्याचा प्रयत्न करू लागलो. बाजूच्या इवल्याशा दोऱ्या उघडल्या आणि आत मधल्या एकेक वस्तू बाहेर काढू लागलो. आत मध्ये ताम्रपत्राचे काही अवशेष पडलेले होते, आणि एक पुस्तक होते. ज्यात मृत्यूबद्दल बरेच काही लिहिलं होतं. अजून काही बरेच होते जे मला समजण्यासारखे नव्हते. पण मी ते समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. रात्रभर मी ते वाचून संपवलं. आणि ते वाचलं तेव्हा मला कळलं की मृत्यु आमच्या मागावर आहे. कारण त्या ताम्रपत्रावर खूप आधीपासूनची रचना केली होती. इतके दिवस का ती थैली

कुठेतरी हरवली होती? ते सगळं बघून मी इतका भांबावून गेलो होतो की माझं मलाच कळत नव्हतं.

ते वाचताना मला कित्येकदा मृत्यू माझ्या दारात उभा आहे याची चाहूल लागून गेली होती. नेहमी मृत्यूचे कारण आजतागायत मी पाप-पुण्याच्या वर्गीकरणात बघितलं. पण इथे जे बघितलं ते खरंच विलक्षण होतं. खरं काय असतं हे उघड्या डोळ्याने आज पुस्तकात वाचलं पण होतं आणि वास्तवात बघत पण होतो.

जग सामोर चाललंय ,विज्ञान प्रगती करतोय हे संशोधन फार प्रमाणात पुढे गेलंय. पण जे आभास आहेत ,सहवास आहेत, जे निराकार आहे त्यांचं काय? ते आपण सोडून देऊ शकत नाही. पुरातन काळातील सत्व आजच्या युगात दिसणार नाही. कारण एका वाटेचे जेव्हा दोन तुकडे होतात तेव्हा त्या सारख्या असत नाहीत. सत्व ही साधारण गोष्ट नाही किंवा तिला मिळवणं ही सुद्धा सोपी गोष्ट नाही. शास्त्रज्ञांच्या मते सांगायला गेलं तर ती अशी एनर्जी आहे जी साधारण नाही. आणि जी गोष्ट अगम्य असते ती कधीच साधारणपणे मिळत नाही.

शेवटची पाने चाळत जाऊन केलेला विचार मनात घोळत होता. अक्खी रात्र केव्हा घोळून गेली याचा मात्र एकदाही विचार आला नाही. खिडकीचे दारे सताड उघडी असूनही बाहेर लक्ष गेले नाही. हरवून जाणे कशाला म्हणतात हे आज मला उमगलं होतं.

नेहमीसारखं दरवाजावर ठक् ठक आली. समजून गेलो की चहाचा टाईम झाला आहे, आणि सगळं काही आवरून मी चहा प्यायला आलो. नुकताच फ्रेश होऊन दाराबाहेर येणार तोच खिशात असलेला फोन खणाणला. बाहेर काढून बघितलं तर एक अपरिचित नंबरचा कॉल होता. कदाचित कोणी ओळखीचा असेल असं समजून मी तो रिसिव्ह केला.

हॅलो....

समोरील व्यक्ती= हॅलो पवन बोलतोय का?..

हो तुम्ही कोण...

समोरील व्यक्ती= मी पोलीस स्टेशन मधून सिनियर इन्स्पेक्टर राठोड बोलतोय. नमनला ओळखता का?

कोण नमन?

पोलीस= नमन देसाई... त्याच्या मोबाईल मधल्या कॉलिंगवरून सगळ्यात पहिला नंबर तुमचाच होता.

नमनला काय झाले?(घाबरतच. )

पोलीस= सगळं माहित होईल तुम्ही ताबडतोब पोलीस स्टेशनला या.

नमन बद्दल ऐकताच माझ्या अंगावर काटे उभे राहिले होते. एका रात्रीचा फक्त अंतर झाला होता. कालच मी त्याला भेटून आलो होतो, आणि या मार्गावर काहीतरी उपाय करणार होतो. आणि इतक्यातच हे असं माझ्यासाठी फार भयंकर होतं. त्याचा परत जाणारा चेहरा माझ्या पुढ्यात साकारला आणि डोळ्यातून पुन्हा अश्रू ओघळू लागले.

मी इकडे तिकडे न बघता डायरेक्ट धावतच पोलीस स्टेशनचा पल्ला गाठला. कुणालाच काही न विचारता मी एखाद्या

वेड्यासारखा आत शिरलो. बाहेरून दोन हवालदार माझ्या मागे धावत धावत आले, आणि त्यातील एक म्हणाला,

काय रे काय काम आहे? असं वेड्यासारखं का चालत आला. चल हो बाहेर.

सगळा स्टाफ हे सगळं बघत होता. आणि काय झालं? असा कडक आवाज सगळ्यांच्या कानावर आला. सगळ्यांची नजर आवाजाच्या दिशेने आतमधून येणाऱ्या इसमावर खिळली. दरवाजाचा किर्र किर्र आवाज कानात घुमला. आणि कॅप डोक्यावर ठेवत, खाकेत अडकवलेली लाठी उजव्या हातात घेत इन्स्पेक्टर राठोडचे आगमन झाले. राठोड येथे तीन चार महिन्याचा कालावधी झाला आला असेल. वयाच्या तीस ते पस्तिशितला असल्यासारखा भरदार बांधा,चेहऱ्यावर असलेली एक शोधक नजर, किंचित विचार करून कपाळाला पडलेल्या आठ्या आणि रुबाबदार पोशाखावर असलेले स्टार आणि भरदार छातीवर असलेले मेडल.

शहरात असलेली दारूबंदी,टवाळखोरांच्या टोळ्या,चोरी करणारे वगैरे सगळ्यांच्या मनात भीती उत्पन्न करणारा हा पहिला

इन्स्पेक्टर. ज्याने तीन ते चार महिन्यात पूर्ण शहराचा कायापालट केला होता. त्याची आणि माझी आज पहिल्यांदाच ओळख झाली होती. पण त्याबद्दल मी बरेच काही ऐकलं होतं. त्याचा तो आवाज बघून गुन्हेगारांची वाचा बसून जायची. जरा जवळ आल्यावर रुबाबात तो म्हणाला,

"काय रे कोण तू?आणि काय काम आहे?

सर मीच पवन... आता काही मिनिटांपूर्वी तुमचा कॉल मला आला होता.

अरे हा... ये इकडे... आणि तुम्ही जा रे आपापल्या कामावर. (बाकीच्यांना ओरडत. )

राठोडच्या मागे मागे मी त्यांच्या केबिनमध्ये गेलो. आधी त्याने मला बसायला सांगितले, आणि नमनबद्दल झालेला वृत्तांत तो मला कथन करू लागला. काल तीन ते चार वाजताची ही घटना आहे. भर रस्त्यात कोणीतरी त्याला इतक्या वाईट पद्धतीने मारले आहे. की कुणाला कळले सुद्धा नाही. कारण प्रत्येकाने मोबाईलवर शूट घेताना त्याला मारणारा असा कुणीच कुणाला दिसला नाही.

काल जेव्हा फोनवर मला हे सगळं माहीत झालं, तेव्हा घटनेचे गांभीर्य धरून मी त्वरित कारवाई केली. या पद्धतीने कोण मारू शकतो?त्याचा कोण वैरी असेल?काल मी त्याला हॉस्पिटलला नेले पण त्याचं पोस्टमार्टम रिपोर्ट पण विचित्र होता. त्याच्या शरीरात उष्णता फार प्रमाणात होती. एक अद्भुत पद्धतीचा द्रव्य त्याच्या शरीरात संचारत होतं, आणि ज्या चाबकाचे फटके त्याला बसले होते, त्या पद्धतीचं चाबूक आयुष्यात मी सुद्धा कधी बघितला नाही आहे.

त्याच्या ओळखीचा मला कुणी भेटला नाही. एक तर त्याचा चेहरा पण इतका विद्रूप झाला आहे की ओळखायला येत नाही. त्यामुळे जाहिरातीला मी काही फोटोज पाठवण्यास मान्यता दिली नाही. पण ऑलरेडी त्याचे व्हिडिओ फुटेज सोशल मीडियावर येऊन आहेत. हे बघा आणि त्याने मला काही व्हिडिओज दाखविले. ते बघताच मी जे काही समजायचे ते समजून गेलो आणि नमनची डेड बॉडी कुठे आहे साहेब? जरा अडखळतच विचारलं...

कोणी त्याच्या ओळखीचा नसल्यामुळे डेड बॉडी येथेच आहे. पण त्याच्या सामानात हा मोबाईल सापडला, आणि पहिला

नंबर तुमचा दिसला. म्हणून मग मी तुम्हाला कॉल केला. चला मी तुम्हाला बॉडी दाखवतो.

खरंतर नमन म्हणजे तो एकच असा माणूस होता माझ्यासाठी, जो पुरेपूर माझी मदत करणार होता. माझ्या प्रत्येक वाटेवर त्याची किंमत पण होती. पण मृत्यूने घेतलेला हा एक बळी खरंच मला खूप महागात पडला होता. ज्यामुळे परत एकदा माझ्या वाटेवर मी एकटा पडला होतो. मृत्यूच्या सामोरी.

इन्स्पेक्टर राठोड खाडखाड बूट वाजवत बाजूच्या खोलीत गेला आणि मी त्याच्या मागोमाग गेलो. समोर पांढऱ्या कपड्यात असलेला एक मृतदेह माझ्यासमोर पडलेला होता. कितीतरी साहसानंतर डोळ्यांच्या अश्रूंना सांभाळत मी त्या मृतदेहाच्या जवळ आलो. त्याने घेतलेल्या मैत्रीचे शब्द लक्षात घेऊन मी त्याच्या चेहऱ्यावरून पडदा सरकवला. आणि नमनची ती चित्र विचित्र आकृती माझ्या नजरेत तरारली.

क्षणभर मनाला असह्य यातना झाल्या, आणि मी बाजूला झालो. हे काय झाले मित्रा?नको ते भावनाप्रधान बोल माझ्या मुखातून निघू लागले. शिवाय त्याने घरच्यांना न सांगण्याचे मला

आश्वासन दिले होते. त्यामुळे मी त्याच्या घरी पण काही सांगू शकत नव्हतो. शेवटी त्याच्या मृत्यूसरणाचा खांदा मीच बनलो होतो. त्याच्या चितेची ती धगधगती ज्वाळा मला असह्य यातना देत होती.

शेवटचा एक साथीदार सुद्धा मी गमावून बसलो होतो. त्यामुळे मला एकटा असण्याची खंत आणि हुरहूर क्षणोक्षणी इथे जाणवत होती. त्याने सांगितल्याप्रमाणे मी त्यादिवशी रिनाला भेटायला गेलो. आधी तर ती ऐकायला तयारच नव्हती पण हातात असलेली अस्थी दाखवत म्हणालो,

रिना शेवटपर्यंत अगदी नमन तुझाच होता. त्याचं प्रेम खरं होतं. तुझ्या स्पर्शाने बघ कळेल तुला. कारण गेल्या काही दिवसांपासून बरंच अपरिचित घडत होतं. त्यामुळे त्याने तुला अव्हेरले होते. पण तुला सोडलं नव्हतं. जातेवेळेस त्याने मला वचन मागितले होते. त्यामुळे आजपर्यंत मी तुला काही सांगू शकलो नाही. पण त्याच्या सरणाच्या ज्वाळा देताना मी घेतलेल्या पूर्ण शपथा तिथे जळून खाक केल्या. पण चुकून त्याच्या घरी असं कधीच सांगू नकोस की तो मृत्यू पावला आहे म्हणून. हे त्याची शेवटची इच्छा आता आपल्यालाच पूर्ण करावी लागणार.

जरा वेळाने खरं काय कळलं की हृदयातला पराग काढून घ्यावा इतकी अंतकरणातली धडधड, बाहेर कुणाच्या कानापर्यंत येत असते. शेवटी काय असतं!!! प्रेम एकदा परत नव्याने उमलून येतं,परत एकदा त्याच्याबद्दल नवी उमेद, नवी भावना तयार होते. नवा आदर त्याच्याबद्दल जागृत होतो. आणि हे मला तिच्या डोळ्यात स्पष्टपणे जाणवत होतं. पण गेलेली वेळ ही काही परत येणार नव्हती.

कारण नमन बोलून गेल्यावर रिनाला त्याच्याबद्दल परस्पर घृणा तयार झाली होती. ज्यामुळे त्याचं नाव घेताच नको त्या शंका तिच्या मनात घुसमटत असायची. पण त्याही वेळेस आणि याही वेळेस अश्रुंनी तिची साथ सोडली नव्हती. ज्यामुळे सतत बिचारीच्या मागे विरहाचं दुःख लागलं होतं. क्षणभर असं सांगितल्यावर मी तिची अवस्था चांगल्याप्रमाणे समजू शकत होतो. नमनला तिच्या हवाली केलं, आणि ती काहीच न बोलता पाठमोरी होऊन निघून चालली गेली. परतीला जाताना मला स्वतःची इतकी लाज वाटू लागली होती की जाऊन कुठेतरी आत्महत्या करावी. आणि तेही मृत्यू यायच्या आधीच. असं वाटत होतं.

अपराधी अंतकरणाने मी स्वतःला घरी गेल्यावर बंद करून टाकलं. काही वेळ झालाच असेल की तेवढ्यात परत एकदा राठोडचा फोन आला. त्यांनी मला पोलिस स्टेशनला बोलावले.

तुला काय वाटतं... नमनचा मृत्यू कसा झाला असेल?

सर जे झालं आहे, तुमच्या माझ्या नकळत झालं आहे. आणि जे डोळ्यांनी बघितले आम्हाला याची पूर्व कल्पना होतीच. ज्यामुळे नमन घराच्या बाहेर असं स्वतःचं अस्तित्व लपवून होता. ज्या दिवशी ही घटना घडली मी नुकताच त्याला भेटून आलो होतो.

पूर्वकल्पना म्हणजे नेमकं काय म्हणायचंय तुम्हाला... ! तुम्हाला माहित आहे का? नमनच्या मृत्यूमागे कोणाचा हात आहे ते?

सर तुमचा विश्वास बसणे योग्य आहे की अयोग्य, माहिती नाही.. आणि मी त्यांना पूर्वीपासूनची सगळी कहाणी इथंभुत केली.

ओ आय सी... पण तुम्हाला काय वाटतं? या असल्या भाकड कथांवर लोक विश्वास ठेवतील काय?आम्हाला पोलीस ठाणे बंद करून घरी बसावे लागेल.

मला वाटलंच होतं सर.. म्हणून मी तुम्हाला खरं काय ते सांगण्यास भीत होतो. पण हे सगळं अगदी खरं आहे. आणि माझे तीन मित्र त्यात बळी गेले आहेत. आणि नमन म्हणजे तुमच्या समोरचा ताजातवाना उदाहरण आहे.

तुझं म्हणणं बरोबर आहे, पण हो... कल्पना जोडली म्हणून वास्तविकता बदलत नाही. तुमच्या मते त्यांना मृत्यूने मारलाय. पण माझ्या मते कोणीतरी फार विचार करून केलेला खून आहे.

अहो तुम्ही चारही केसेस बघा... एकच व्यक्ती एक सारखा कधीच मर्डर करणार नाही. आणि जे काही व्हिडिओ बघितले, त्यात तुम्हाला दिसते का काही? मर्डर केल्यासारखे.

हे बघा... मला वाद करायचा नाही आहे. आणि माझं तपास सुद्धा चालू आहे. पण मला असं वाटतं, की हे मर्डर आहे. आणि

जगात अशी कितीतरी केस आहेत. मी आता त्यांचा शोध लावणारच आहे.

ठीक आहे सर... तुम्हाला योग्य काय वाटते तो तपास करा?आणि मला काय करायचे ते मी ठरवतो. असे म्हणून मी तिथून निघालो.

## ११)इन्स्पेक्टर राठोडची आणि रितुची पूर्वतयारी...

सततच्या होत असणाऱ्या शारीरिक यातना, मला होत्या की नाही हे मला माहिती नाही, पण रितूला माझा प्रत्येक दिवस हा एक संकल्प होता. इतक्या भयानक वेळीसुद्धा तिने क्षणभरही अंतर मला दिला नव्हता. आणि मी मात्र नेहमी तिला विरहात ठेवलं होतं.

या दोन ते तीन दिवसात माझ्यात काहीच बदल पडलेला नव्हता. याउलट माझ्यावर नको त्या वळांचे जखम मात्र झाले होते. स्वतः डॉक्टरच्या मागे एकच नवे आव्हान उभे राहायचे. आणि माझी आई एका मुलाच्या मायेने त्यांच्या पाया पडत होती. परत एकदा तो व्हिडिओ सगळेच बघू लागले. जे राठोड ने रात्री बघितले होते.

ज्या वेळेस रात्री हे घडत होते त्यावेळेस रितू हे सगळं डोळ्याने बघत होती. आभासी मृत्यू काय असतं? हे तिने

चांगल्याप्रकारे जाणले होते. त्या दिवशी अचानक राठोडने सकाळी येऊन माझी चौकशी केली आणि रितुला विचारू लागले.

इन्स्पेक्टर राठोड - यांच्या या वागण्यावर तुमचं काय मत आहे?

रितू - मत काय आहे त्यात? रोज तो तिळतिळ सोडून जात आहे आम्हाला.. ज्यावेळेस त्याची पूर्ण प्रतिकारात्मक शक्ति संपेल.. तोही पूर्ण संपून जाईन. डोळे पुसता पुसता रितू म्हणाली...

इन्स्पेक्टर राठोड - खरं सांगायचं तर आता मलाही वाटायला लागले की त्या दिवशी पवनने मला जे काही सांगितलं होतं. ते अगदी खरं होतं. पण माझ्या कायद्यात बसत नसल्यामुळे मी ते टाळले आणि प्रश्न मिटतील अशी शंका बाळगली. वाटलं नव्हतं असं परत घडणार म्हणून.

रितू - आता त्याचा काही उपयोग नाही सर... कारण मुळात तुम्ही जे केले असते ते निरर्थकच असते. तुम्हाला तर डोळ्यांना दिसणारे सत्य पाहिजे. आणि इथे न दिसणारे सत्य आहे. ज्यामुळे

तुम्हाला खरं काय आहे?ओळखता नाही आले. आणि येणार पण नाही.

इन्स्पेक्टर राठोड - खरंच चुकलो मी... पण आता तयार आहे. या वेळेस जरी का मला कायद्याच्या बाहेरही जाऊन काम करावे लागले, तरी आता तयार आहे. मला एक पोलिस म्हणून जितका अभिमान आहे, तितकाच एक माणूस होण्याची लाज वाटत आहे. आता सांगा काय करावे लागेल?

रितू - काय करायचंय?ते अजूनही मला कळलेलं नाही. पण जे काही आहे ते पेरजागडाशी संबंधित आहे. कारण हे सगळं तिथूनच तयार झालं आहे. गेले काही दिवस बेपत्ता असणारा पवन शेवटी तिथेच मिळाला होता.

इन्स्पेक्टर राठोड - मी रात्री या गोष्टीचा खूप विचार केला. पवनने सांगितल्यानुसार त्याची हत्या एकाच हत्याराने केल्या जात आहे. चाबूक!!! आणि सगळ्यांचे मृत्यूसुद्धा एक सारखेच आहे. अगदी आता पवनसुद्धा. पवन आणि नमन दोघांचे पण रात्रीला वारंवार व्हिडिओज बघितले. खरंच भयंकर व्हिडिओ आहेत. लोकांनी त्यात तर्कवितर्क केले आहेत. बरंच काही गूढ गुपित

घडलेले आहे. नक्कीच काहीतरी फार मोठा प्रसंग आहे. ज्यात पवन अडकला आहे, अशी मला खात्री वाटत आहे.

रितू - त्याबद्दल मला पण इतकं खात्रीने माहिती नाही. पण इतक्यात जे काही घडलं, ते सगळं जिथं घडलं, ते पेरजागढ आहे. आणि आज दुपारपर्यंत तिथले काही प्रतिष्ठित माणसं येणारच आहेत. पवनची भेट घ्यायला. नक्कीच काहीतरी मदत मिळेल अशी मी आशा बाळगते. कारण जाताना फक्त पवन इतकाच म्हणाला होता...

त्या दिवशी सकाळीच मी त्याला भेटायला गेले होते कसल्यातरी विवंचनेत आधी सारखाच तो रमलेला होता. मला दारात बघताच अचानक त्याच्या चेहऱ्यावर उसने हसू विस्तारले, आणि म्हणाला... आज चाललोय रितू. जाण्यापूर्वी तुला सांगू इच्छितो की कदाचित परत येईन, अशी आशा बाळगू नकोस. जर मी परत आलो तर तुझाच असेन.. जर नाही आलो तर मात्र तू माझा विचार न करता राहायचं. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत... माझ्यासाठी. प्रेमाने आपल्याला निरंतन कायम जवळ केलेले आहे. त्याला मृत्यू आपल्याला कितीही दूर करेल तरी दुरावा आणू शकत

नाही. पण जर मी नसलो तरी तू लग्न करावं, आणि तुझा सुखाचा संसार मांडावा अशी माझी इच्छा आहे.

आज मी चाललोय. फक्त एका किरणाच्या आशेवर. आता समोरचे काय आहे ते कदाचित मलाही माहिती नाही. म्हणून कधीच माझ्या बाबतीत इतका विचार करु नकोस की तुला स्वतःला त्रास होईल. जा आनंदित रहा, फक्त माझी वाट बघ... मी येणार किंवा नाही येणार आता सगळं त्याच्यावर. (असे म्हणून त्याने वर बोट दाखवले होते. )

इन्स्पेक्टर राठोड - म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे की पवनला याची चाहूल लागली होती. की नक्कीच तिथे गेल्यावर त्याचे प्राण वाचू शकेल.

रितू - हो कदाचित.....

दुपारच्या वेळेला काका-काकू समवेत सोनापूर येथील काही प्रतिष्ठित लोकं, सरपंच, पेरजागढच्या ट्रस्ट मधील काही मंडळी असे बरेच जण मला भेटायला आले. राठोडने त्यांच्याकडून हवी ती माहिती घेतली. पण आवश्यक अशी माहिती त्यांना अजिबात

मिळाली नाही. याउलट त्यांना मी कसा माणूस आहे? माझ्या बोलण्याचा व्यवहार, माझं काम करणं, अशा बऱ्याच माझ्याबद्दल चांगल्या गोष्टी ऐकायला मिळाल्या.

आता असं वाटत होतं की मृत्यूच्या वाटेवर हरवलेला मी, मला शोधण्यासाठी कुणी दोन काजवे कुजबुजत येत होते. त्यात एक रितू आणि इन्स्पेक्टर राठोड ज्यांच्या त्या एकतर्फे बोलण्यामुळे सुरुवात झाली होती.

शोधमोहीम सुरु झाली. वृत्तपत्रांवर नको त्या तर्कवितर्क बातम्या चालू झाल्या होत्या. परत एकदा पवन चाबकाच्या शिक्षेस पात्र. अशी जागोजागी अफवा चालू झाली होती. याचं कारण काय? प्रत्येकजण स्वतःच्या विचारात होता. राठोडने आपले दोन ते तीन सहकारी घेऊन केव्हाच गडावर रवाना झाला होता. काहीतरी त्याच्या डोक्यात तरारत असावे किंवा काहीतरी मिळणार असे त्याला वाटू लागले होते.

शोध मोहिमेवर जाताना राठोडला एक चित्रविचित्र आकृती सोनापूर मधून बघत होती. ती म्हणजे गावातील एक व्यक्ती. कसं आहे जग आपला एक विशाल युग आहे. जितकी त्याची

लोकसंख्या आहे तितकीच त्याची तेवढी विचारसरणीही आहे. एखाद्याला एखादं चित्र आवडलं तर पहिला सुंदर म्हणतो तर दुसरा मस्त. अर्थात अर्थ याचा एकच असतो, पण प्रतीक करायच्या भावना तितक्याच वेगळ्या असतात. यातच असते चांगल्या आणि वाईट विचारांचा समावेश. दिसून येत नसतात पण त्यांना बघावं तर आपल्याला वाटत पण नाही.

तो व्यक्ती म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून तिथला काही वर्षाआधी असलेला सरपंच होता. खेड्यात कसं राजकारण अंगाशी येतं. आणि मराठीतच प्रचलित एक म्हण आहे "ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी". ज्यावेळेस तो सरपंच होता तोपर्यंत त्याने वाईट पद्धतीने पैसा खूप मिळवला होता आणि याच कारणामुळे काही माणसे वगळून गावातून एक वेगळी पार्टी बनवली. त्यामुळे एक गाव दोन तुकडे अशी परंपरा चालू झाली. दोंन पार्टीचे गाव असल्यामुळे गावातील प्रत्येक गोष्ट त्या दोघात रुजत असे. "दोघांची बरोबरी तरच गाव राजी, नाही तर दगाबाजी" अशी गोष्ट व्हायची. गाव छोटं होतं पण त्या गावात बरेच राजकारण चालायचं. अर्थात ते कुणाला पटायचं किंवा नाही.

प्रत्येकाच्या विचारांनी जनजागृती करण्याचे काम चाललं होतं. आपल्या पक्षासाठी नको ते वाद चालायचे. इतक्या पर्यंत मजल चालली जायची, की जर एखाद्याकडे पाहुणा आला तरी वैरपक्षाच्या घरी तो पाणीसुद्धा पिऊ शकत नसे. खरं तर प्रत्येक गावाची एक वेगळीच पद्धत असते. पण इथे जरा वेगळं कारण होतं. काय घडू शकते याची कुणालाच काही माहिती नव्हती.

# १२) पेरजागढ संशोधन...

नमनच्या मृत्यूनंतर मी फार प्रमाणात एकटा पडलो होतो. त्यामुळे सतत कुठे जावे? काय करावे? याचा विचार नेहमीप्रमाणे येतच होता. अशात एक विचित्र घटना माझ्यासोबत घडली होती. शेतात जाताना मी एका शेपटी गळलेल्या नागाचा प्राण घेतला होता. त्यामुळे मला सतत नाग दिसत असायचे. कधी स्वप्नात तर कधी सत्य रूपात. कित्येकदा कुठे बाहेर जरी फिरायला पडलो तरी दर्शन व्हायचे. त्याचे कारण नंतर मला बुजुर्गमंडळींकडून समजले. जेव्हा एखादा नाग कुण्या एखाद्याला दंश करतो तेव्हा त्याची शेपूट गळून पडते.

या दोन-तीन दिवसाच्या सहवासात "बदला नागिन का" हा सिन चांगलाच अनुभवला. त्यामुळे घरी सगळे ओरडू लागले होते, की नको तसले उपद्रव कशाला करतो हा मुलगा. आता जीव घेतलं त्या बिचाऱ्याचा. आता कोप झालाय त्या नागमातेचा. मग मागे तर लागणारच आहे. उपासना कर म्हणावं नागद्वारला जाऊन. नाहीतर

वंशाचा दिवा विझायची वेळ आलीया लवकरच. पण नमनची गोष्ट आठवली. आपण तरी आपल्या शेवटच्या घटका आई-वडिलांच्या शब्दाबरोबर जगाव्या असं वाटत होतं. शेवटी तयारी केली आणि नागद्वारला निघालो.

पचमढीच्या सातपुडा पर्वतावर बसलेले एक श्रद्धास्थान. जंगल दाट असल्यामुळे आणि वन्यप्राण्यांचा बराच वावर असल्यामुळे वर्षातून फक्त काही दिवस या स्थळाची भेट घेता येते. निसर्गाच्या सानिध्यात असलेले आणि गगनात विहार करत असल्याचे असे विलोभनीय दृष्य दृष्टीक्षेपात येते. खरं तर आधी जायला मला फार वाईट वाटले, पण निसर्गाचा तो देखावा बघून मला फार छान वाटत होते.

तिथल्या दंतकथा ऐकूण मग माझ्या लक्षात आलं की आपल्या भागात बऱ्यापैकी स्थान आहे. ज्याची आपण कधी नोंद केली नाही. आणि माझी एक आगळीवेगळी सवय म्हणजे, मी जिथे पण गेलो तिथल्या काही निसर्गाच्या चित्रफित जमा करून मी त्या लोकेशनवर डिस्क्रिप्शन मध्ये टाकत असे. आणि वर फेसबुक आणि व्हाट्सअप वर सुद्धा जिथे तिथे शेअर करत असे. त्यामुळे एक ट्रेकर म्हणून माझी जिकडेतिकडे ओळख होती. आणि

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे माझ्या डोक्यात ट्यूब पेटल्यासारखं तेव्हा लक्षात आलं. आपल्या अस्तित्वाला ही अशाच काही गोष्टी कारणीभूत आहेत ज्या आपल्याला अजून शोधायच्या बाकीच आहेत. मनात जिज्ञासेने जोर बांधला, आणि नागद्वारवरून येताना एक नवी कल्पनाच घेऊन मी घरी आलो. काही वेळ आपल्या मनात असणाऱ्या कितीतरी प्रश्नाचे संग्रह केले आणि त्या संग्रहाला एकच उत्तर दिले "पेरजागढ" आणि पेरजागढ या गडाची नोंद माझ्या कानावर आली होती.

खरंतर पेरजागढ या नावाने मी त्या दिवशीपासूनच एक रिसर्च करणं चालू केलं होतं. कारण कुठे ना कुठे त्यात माझा संबंध आहे असे आढळून येत होतं. ऐतिहासिक वारसा लाभला असलेल्या त्या डोंगराला बऱ्याच प्रमाणात काही रहस्यमय गोष्टी होत्या. ज्याज्या बाजूने आपण त्या टेकडीला बघत होतो त्या त्या बाजुला एक वेगळीच दंतकथा आणि एक वेगळी सृष्टी असे आपल्याला दिसून येतं.

अगदी रामायणातलं सांगावं तर त्यांच्या चौदा वर्षांच्या वनवासात दहा वर्षाचा वनवास त्यांनी मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या दरम्यान असलेल्या जंगलात घालवला. त्यामुळे डोंगराच्या काही

प्राचीन गुफामध्ये त्यांचे अस्तित्व आहे. वर महाभारतामध्ये पांडवांना जेव्हा वनवासाची पाळी आली होती. त्यांचाही वास् या डोंगरभागावर होता. ज्यात "पाच पांडव गुफा" म्हणून एक प्रसिद्ध स्थळ आहे. ज्यात दगडामधे कोरलेल्या पाच गुहेची प्रचिती आपणास बघायला मिळते. हे झालं लोकांच्या मते असलेल्या काही श्रद्धेची स्थळे. नागभीडच्या शिव टेंपलला भोसलेकालीन एक प्राचीन विहीर आहे जी आज पडक्या अवस्थेत आहे. पाच पांडव गुहेपासून काही अंतरावर शिकारदेव म्हणून एकाश्म स्मारक आहेत.

त्यानंतर त्याच्या उजव्या बाजूस "आंबाई निंबाई" म्हणून एक स्थळ आहे. जिथे शिवशंकराची प्रचिती आणि न संपलेले सत्व थोड्याफार प्रमाणात दिसून येते. त्या ठिकाणावरुन समोर एक मुक्ताईचे मंदिर आहे. एक स्त्री असून सुद्धा तिने राणी लक्ष्मीबाई सारखे युद्ध खेळले आहे. तिथले लोक याची ग्वाही देतात. आणि त्याच परिसरात हल्ली वाटरफॉल असल्यामुळे लाखो लोक त्याचा आनंद मिळवण्यासाठी येतात. सामोरी गेल्यावर मुक्ताईचं लढाई केलेलं मैदान आणि काही तिच्या पाऊलांची चिन्ह दिसून पडतात.

तिथून सामोरे गेल्यावर सारंगड येथे घोळपाक नावाची गुहा आहे. ज्यात गोंडा महादेव अशी एक प्राचीन गुफा आढळते. ज्यात सदोदित एक पट्टेदार वाघ त्याचं रक्षण केल्यासारखं तिथे नेहमी बसून असतो. तिथून समोर गेल्यावर आत जंगलात एक धबधबा आढळतो. सतत पडत असणारी त्याची धारा यामुळे त्याला "सातधारा" असे नाव पडले आहे. त्याचा सहज आस्वाद घेता येत नाही कारण कितीतरी आत असलेला हा धबधबा वन्यप्राण्यांच्या वावरात असतो.

काही अंतरावर एक पुरातन महादेव आढळतो आणि लोकं त्याला कोलाम देव म्हणून संबोधतात जो काही अंतरावर जंगलाच्या आत आहे.

आणि सगळ्यापासून वेगळं असतं ते पेरजागढ. जे घोडाझरी तलावात जाऊन समाप्त होते. या पेरजागडाची एक आगळी गंमत आहे. सगळ्या डोंगररांगांमधून पेरजागढ हे सगळ्यात उंच स्थान आहे. जे फक्त दगडांच्या रचनेवर आहे. या डोंगराचा काही भाग इतका उंच आहे की समोरचा संपूर्ण परिसर आपल्याला बघता येतो.

मी जेव्हा पहिल्यांदा पेरजागडावर गेलो होतो, तेव्हा ती एक चावटगिरी आणि फक्त एक उत्सुकता होती. त्याला कारणही अगदी तसंच होतं. कारण एक तर ते विलुप्त होणार होतं. आणि दुसरं म्हणजे मला नवीन स्थान बघायची तेवढीच आवड होती. नवनवीन गोष्टी करणं आधीपासूनचा हा माझा एक नावाजलेला छंद होता.

आत्ताच सांगितले की खूप काही स्थळ मी बघितले होते. त्यामुळे सत्वाबद्दल बरेचसे तथ्य माझ्याकडे होते. इतरात कधी आमची गप्पागोष्टीची बैठक बसली की स्थळांच्या गप्पात अव्वल नंबर हा माझाच असायचा. त्यामुळे कुठे काय बघायचे आहे?किंवा कुठे काय बघण्यालायक आहे?हे मला लोक आवर्जून विचारायचे. आणि मी पण त्यांना एकदम सांगायचो देखील.

पेरजागडावरून उतरताना ज्या गोष्टी मी ऐकल्या होत्या. खरंतर आजीआजोबांनी बालपणी सांगितलेल्या कथेसारखं वाटत होतं. पण त्याची इतकी मोठी कलाकृती नव्हती. जे मी डोळ्यांनी बघितली होती. प्रत्येक वेळेला मला ते जंगल एक वेगळं रूप धारण केल्याचा अवतार दिसायचं.

पायथ्याशी दुसऱ्या कोपऱ्यात एक दगड बॅलन्स होऊन उभा होता. एका छोट्याशा दगडाच्या आधारावर तो उभा होता. पण इतके वादळ येऊन सुद्धा आजपर्यंत कधी तो पडला नव्हता. त्या डोंगराच्या माथ्यावरून बघावं तर घनदाट जंगलांची छानशी कल्पना सुचवायची. नभात प्रवास करणाऱ्या त्या मेघांचा प्रवास त्यांच्या सावलीने आपल्या दृष्टीक्षेपात यायचा. चित्र विचित्र आकृती मध्ये काहीतरी दडलंय असं वाटायचं.

हिरवळीच्या हिरवाईत गड शोभून असायचं. इतकं कष्ट करत जेव्हा आपण गड चढून येतो तेव्हा कुठलाही त्रास किंवा कुठलीही विवंचना मनात येत नाही. एक प्रकारची माया ममता त्या गडाविषयी जागृत होते. ज्यामुळे आपल्या मनात असलेला कल्पनांचा उंचवठा तयार होण्याची चिन्ह आपल्याला दिसून येतात. प्रत्येक स्थळाला ही एक नैसर्गिक देय असते तेव्हा मला कळले.

ज्यांच्या नावाने ते गड ओळखलं जात होतं. त्या सात बहिणींचं पायथ्याशी एक मंदिर होतं. शिळे मध्ये त्यांची स्मृती अशी उदभवतांना आपल्याला दिसत असते. खरंतर दगडांची रचना आणि त्यांची ठेवण ही एक प्रेक्षणीय गोष्ट मला त्यावेळेस कळली.

कारण दगडांची घळई ही पाण्यामुळे होते. पण इथे प्रत्येक छोट्या छोट्या दगडांवर एक मोठा दगड बसलेला होता आणि अशाप्रकारे ते गड बसलेलं होतं की कुणीतरी हाताने ती दगडे बसवलीयत.

मंदिराच्या खालच्या बाजूला एक वाघोबा म्हणून शीला स्थापित केली आहे आणि खरे सांगायचं ठरलं तर जिथे ती शीला स्थापित आहे तिथून खोल दरीचा भाग चालू होतो. आपली पायवाट पण तिथून वळते त्या दरीत पाणी असल्या कारणाने ओलावा कायम असतो. मधेच एखादा माकड या झाडावरून त्या झाडावर उडी मारताना दिसतो. तर रानडुकरे पायथ्याशी हैदोस करत असताना दिसतात.

आणि अस्वलाच्या सतत असलेल्या तिथल्या वास्तव्याने दऱ्या खोऱ्याची कुठलीही कमी नाही त्या गडावर. त्यामुळे सतत वाघ तिथे वावरत असतो. पायथ्याशी जलकुंभ म्हणून एक पाण्याचे स्त्रोत आहे. त्या जलकुंभाची पण एक आगळीवेगळी गंमत आहे. तिथलं पाणी कधीच आटत नाही. काही हुशार माणसांनी लय प्रयत्न केले त्याला शोधण्यासाठी की पाणी कुठून येते म्हणून, पण त्यांना काहीच शोध लागला नाही. पाण्याचा जितका साठा

आपल्या डोळ्यासमोर असतो तो तितकाच असतो. इतर कोणत्याही ऋतूत त्याला कोणताच फरक पडत नाही.

आणि जेव्हा परतीची वेळ येते. तेव्हा परत त्या घनदाट जंगलाला पार करून आपल्याला परत यावं लागतं. जंगलातून एक किंवा दोन किलोमीटर बाहेर आल्यावर एक वेगळाच नजराना आपल्याला दिसून येतो. "जो रडे तो चढे आणि हसे त्याचं खसे". ही म्हण मी त्याच गावातून अनेकांच्या तोंडून ऐकली होती. मला त्या वेळेस त्याबद्दल काहीच कळलं नव्हतं. पण त्याबद्दल माझी जिज्ञासा अधिकाधिक तीव्र होत होती.

रितूची आणि माझी भेट हा सगळ्या प्रकरणानंतर तिथेच झाली होती. त्यामुळे ते गड मला अधिकाधिक आवडायला लागलं होतं. तसं इतक्यात वाढलेल्या रुचीमुळे अंगावर असलेला मृत्यूपणाचा भाव फार कमी प्रमाणात आलेला होता. यामुळे मी कोणत्यातरी कामात व्यस्त आहे असं घरच्यांना नेहमी वाटू लागायचं. अलीकडे युट्युबवर आणि गुगलवर मी याविषयी बरंच संशोधन करू लागलो होतो. तिथे असणारे दगड शिलालेखाच्या कामास येऊ लागतात व पुरातनकालीन जुनाट असे एकाष्म स्मारक त्या जंगलात आढळतात. हे मला माहीत झाले त्यात "राकसनुमा"

नावाचं अत्यंत प्राचीन स्मारक खरच बघण्यालायक होतं. त्यामुळे बरंच काही दैवत्व आणि रहस्य डोंगरदऱ्यात लपून बसले आहे. याची मला जाणीव झाली, आणि दिवसेंदिवस मी त्यावर शोध करू लागलो.

ब्रिटिशकालीन काळात ब्रिटिशांच्या हातून घडवलेला घोडाझरी तलाव आजही पर्यटकांसाठी एक आकर्षण आहे. आणि जेव्हा मी एक शोधक नजर त्यावर टाकली तेव्हा एक अजून आश्चर्य वाटलं. इतर लोक म्हणतात की घोडाझरी तलावाला एका घोड्याच स्वरूप आहे. पण त्याला ड्रोनने बघितल्यावर मला असे कधीच वाटले नाही. याउलट ते मला एखाद्या ड्रॅगनसारखे दिसत होते. मी त्या संपूर्ण भागाचा वेगळ्या पद्धतीने अभ्यास करू लागलो ज्यामध्ये मला बरच काही मिळू लागलं.

निसर्गाची बनावट आजपर्यंत कोणी समजू शकलं नाही पण ज्या घोडाझरीला मी ड्रॅगनचा रूप दिला होता. तो वर बघून हवेत आकाशात उडण्याचा प्रयत्न करतोय आणि बाजूला दहा ते पंधरा किलोमीटर डोंगराच्या पायथ्याशी "कसरला" नावाचे एक गाव आहे. तिथल्या तलावाची कलाकृती पण विचित्र आहे. एक छोटासा प्राणी आकाशात संचार करू बघत आहे आणि हा ड्रॅगन

त्याला पटकावणार अशा पद्धतीचे ते विलक्षण दृश्य वाटते. समोर परत एकदा गडावर लक्ष गेली. मागे एकदा टीव्हीवर न्यूज पोर्टल मध्ये एक वाद वाढला होता. "राम रावण सच या झुठ" त्यांचं इथे काहीच वास्तव्य नाही पण श्रीलंकेत खरंच रावणाचं राज्य होतं की नाही, म्हणून भारतातील काही कॅमेरामेन आणि न्यूज रिपोर्टर लोक तिथे गेले होते. तेव्हा त्यांनी बऱ्याच प्रमाणात असे काही तथ्य दाखवले होते ते एक माझ्या लक्षात आलं होतं.

एक डोंगर दरी दाखवण्यात आली होती. विशेष म्हणजे त्या डोंगराला हनुमानाचे नाव देण्यात आले होते. आश्चर्य वाटण्याचे एकच कारण होतं, ते म्हणजे ते डोंगर. जेव्हापण डोळ्याच्या आडव्या दृष्टिकोनातून बघतो तेव्हा खरंच हनुमानाचे एक विलोभनीय दृश्य दिसतं. बघणाऱ्याला खरंच अशी विलक्षण प्रचिती येते की त्या डोंगराच्या ऐवजी हनुमान तिथे निद्रावस्थेत आहे.

त्याच प्रकारे मी पेरजागढ बाबतीत दृष्टी स्थिरावली तर एक नवल मला तिथेही जाणवले. पेरजागढ म्हणजे सात बहिणींचा गड त्या डोंगराच्या माथेरानपासून सगळ्यात उंच आहे. समोर पसरलेल्या डोंगररांगेत दरी बनलेली आहे, आणि समोर ते डोंगर

घोडाझरीला येउन नामशेष होते. पण आडव्या दृष्टिकोनातून जर बहीण-भावांच्या त्या डोंगरांना बघितले तर एखादी स्त्री तिथे निद्रावस्थेत आहे असं दिसून येते. आकाशाला बघत असलेला तिचा चेहरा, खाई असल्यामुळे माने जवळचा अरुंद भाग आणि समोर भावाचा डोंगर चालू झाल्यामुळे एखाद्या स्त्रीच्या वक्षस्थळा प्रमाणे ते डोंगर दिसते. परत समोर जेव्हा कमरेचा भाग लागतो तेव्हा ते डोंगर अरुंद होते. पायाचा भाग म्हणजे डोंगर कमी-कमी होत घोडाझरी तलावात नामशेष होतो.

ड्रोनच्या मदतीने व मॅपच्या मदतीने मी बऱ्याच काही अद्वितीय चित्रांची अनुभूती घेतली. कुठे प्राचीन काळात असणारे त्रिशुळ आढळले. कुठे शंख दिसून आले. तर कुठे कुठे भयानक वाटणारी मनुष्याची कलाकृती पण तयार आहे. प्रत्येक वेळेस मला कोड्यात टाकणारे प्रश्न वाटायचे.

तिथे प्रत्येक देवस्थान दहा ते वीस किलोमीटरच्या दरम्यान होते. पण प्रत्येक देवस्थानाची एक वेगळी माहिती एक वेगळा संदर्भ असायचा. वर प्राण्यांची भीती असायची. त्यामुळे सहसा कोणी जंगलात जायचं साहस करत नाही. कारण प्रत्येक वेळेस कुणाचा तरी जीव गेल्याची वार्ता कानावर येते. वाघाने हल्ला केला म्हणून

त्याचे चार-पाच फोटो व्हाट्सअप वर जमा होतातच आणि जंगल घनदाट असल्यामुळे वनसमितीने त्याचे संरक्षण सुद्धा अगदी डोळ्यासमोर असल्यासारखे करत होते. एक होतं! तिथल्या लोककथेचा खेळ मात्र बरंच विचित्र वाटत होता. कारण आतापर्यंत सांगितलेलं म्हणजे निसर्गाने स्वतः दाखवलेला सौंदर्य होता. नुसतं इतक्यात आपण रस्त्यावर येणे माझ्यासाठी उचित नव्हतं. कारण निसर्ग स्वतःला कलेकलेने घडवत असतो, आणि हे सगळं कदाचित योगायोगही होऊ शकतो. त्यामुळे मी ट्रेकिंगचा प्रयत्न केला.

## १३) रहस्याचा थोडाफार खुलासा आणि पवनचे सोनापुरात आगमन...

काही दिवसांपूर्वीच मला आपले नातेवाईक सोनापूरला असतात असे कळले. आधीपासूनच मी रिलेशनमध्ये कुठे गेलो नसल्यामुळे माझी कित्येकांशी ओळखी अशी अर्धवटच होती. त्यामुळे तिथले नाते माझ्यासाठीतरी अपरिचितच होते. काही दिवसांपूर्वी ते गावाकडे आले होते. त्यावेळी माझा आणि त्यांचा परिचय झाला. मला त्यांनी आवर्जून आपल्या गावाकडे यायला सांगितलं आणि यावेळी तशी संधी पण चांगली होती.

त्यांचा नंबर बघत मी त्यांना कॉल केला आणि मी येत असल्याचा खुलासा केला. मी येत असल्यामुळे त्यांनी पण आनंदाने मला, अगदी आवर्जून ये म्हणून म्हटलं. कारण त्यांच्यासाठी आणि माझ्यासाठी तरी मी पहिल्यांदाच तिथे चाललो होतो. त्यामुळे जितका आनंद मला तिथे जाण्याचा होता तितकाच आनंद माझ्या जाण्याने त्यांना सुद्धा होता.

गडावर जायच्या आनंदात असताना मी इकडे तिकडे रूम मधून चकरा मारू लागलो. अचानक त्या साधूने दिलेल्या त्या थैलीची आठवण झाली आणि परत एकदा थैलीतून ताम्रपत्राची ती पाने काढली आणि डोक्यात परत एकदा विचारांचं काहूर जमा झालं. अचानक दारावर ठक ठक आली दरवाजा उघडला दारावर गोड स्मित पसरवून रितू उभी होती.

"तू आहेस का... ये आत ये"

"का अजून दुसरा कोणी येणार होतं काय?"

तिचं मात्र खरं होतं चेहऱ्यावरली भाषा अगदी पुस्तकाचं पान वाचल्यागत टिपून घ्यायची. आणि कदाचित याच गोष्टीवर मी तिच्यावर फिदा झालो होतो. चेहऱ्यावरचे बारा बघून ती म्हणाली... तू बस मी पाणी घेऊन आले..

रितू माझी अगदी बालपणीची मैत्रीण होती. शेजारच्या गजेंद्र मामाजीची मुलगी. संबंध सोयर तसे चांगले होते. आतल्या भाकरीचे दोन तुकडे करून खाणारे माणसं आणि आमचं भेटकोट आधीपासूनच असायचं. त्यामुळे कुणाला काही बोलायची भारी

भीती. पण जे चालत होतं ते प्रत्येकाच्या नजरेत होतं. कुणाला कुणावर संशय नव्हता. फक्त असायची ती जबाबदारी. त्यामुळे आमच्या प्रेमाला असं कोणाचाच विरोध नव्हता. अगदी आम्ही एकमेकांसाठी आहोत अशीच चर्चा चालायची आमच्या मोहल्ल्यात.

आधीपासूनच चंचल, समजूतदार आणि साजेशी... ज्यामुळे स्वतःचं स्थान तिने तेव्हापासूनच घरात कायम करून ठेवलं होतं. माझं मृत्यूप्रकरण जेव्हा पासून चालू झालं तेव्हापासून माझ्यावर सगळ्यात जास्त प्रेम करणारी आणि आधार देणारी ही तीच होती. त्यामुळे तिचं येणं मला आवडायचं.

ग्लास माझ्या हातात देत म्हणाली..
आता काय झालं परत? चेहऱ्यावरचं रूप मावळायला...

अगं काही नाही.. उद्या निघणार होतो, पण अचानक ईथे लक्ष गेली. आणि मला परत काहीसं सुचायला लागलं...

काय?

तू तुझ्या मोबाईलचं मॅप चालू कर. माझी चार्जिंग संपलीय...

तिने तिच्या मोबाईलचा मॅप चालू केला. आणि पेरजागडपाशी जाण्याचा प्रयत्न करत होती. आणि मी ते ताम्रपत्र काढलं. आतापर्यंत निसर्गाचे जे चित्र मी बघत होतो ते योगायोग नव्हते. ताम्रपत्रावर पूर्ण पर्वतमाला उमटली होती. ज्यात काही खुणा होत्या.

मघाशी ज्या त्रिशूल आणि शंख विषयी मी बोलत होतो ते मी डोळ्यांनी टिपलं असं मला वाटलं. पण त्या सर्व आकृत्या अगदी स्पष्टपणे ताम्रपत्रावर कोरलेल्या होत्या. क्षणभर ताम्रपत्राकडे आणि तिच्या मोबाईलकडे बघत होतो. काहीच कळत नव्हते. हा कशाचा संयोग आहे? कशाच्या खुणा आहेत या सगळ्या?

माझ्या अजूनही त्या लक्षात येत नव्हत्या. रितूही सारखी सैरभैर माझ्याकडे बघत होती. तिला ह्यातलं गुपित काहीच कळलं नव्हतं. कारण जी रचना आज आपण डोळ्यांनी बघत आहोत याची पूर्ती याआधीच झाली आहे, आणि आतापर्यंत मी काय काय शोधत होतो? खरं तर माझ्यासाठी ही एक नवलाचीच गोष्ट होती. पण एक समाधान मात्र नक्की चेहऱ्यावर उघडलं होतं.

कदाचित इतक्या दिवसांच्या अप्रतिम कष्टानंतर मिळालेलं हे पहिलं समाधान होतं. नक्की मी माझ्या मृत्यूच्या रहस्याच्या कुठेतरी जवळ आलो आहे, याचा भास वाटू लागला होता. शेवटी मी ते ताम्रपत्र थैलीत टाकलं आणि रितुला म्हणालो उद्या निघायचं आहे मला. कदाचित हाच आधार मला माझ्या मृत्यूपर्यंत नेण्याचं मार्ग अडवु शकतो.

प्लीज यार... असं नको बोलूस... जाताना कधीही येते म्हणावं!! आणि मला खात्री आहे, तू नक्की येशील. निदान माझ्यासाठी तरी. झोप आता.. कारण मी उद्या तुला भेटणार नाही. बाबांसोबत तालुक्याला जात आहे आणि नातेवाईकांकडे पण. सांगायला आली होती. हलकेच कपाळाची किसी घेऊन तिने माघार घेतली आणि दरवाजा बंद करून ती निघून गेली. रोजच्यासारखा दिवसभराच्या घटनाक्रमाचा अभ्यास करत मी सुद्धा केव्हा झोपेच्या स्वाधीन गेलो मला सुद्धा कळलंच नाही.

सकाळी सांगितल्याप्रमाणे रितु तर आलीच नाही पण मी निघालो प्रवासाला. दोन ते अडीच तासाचा प्रवास असल्यामुळे फारसा काही थकवा आला नाही. नैसर्गिकतेचा आस्वाद घेत मी

त्या गावात जाताना फक्त इतकाच विचार करत होतो, की जंगल भागात राहणे म्हणजे, कसे राहात असतील ईथले गृहस्थ? हा एक प्रश्न होता की सर्वसाधारणपणे असलेल्या माणसाला कदाचित विचार पडलाच असता. सतत असलेल्या दृष्टिकोनात गोष्टींची माणसाला इतकी सवय होऊन जाते, की भय कशाला म्हणतात हे सुद्धा कळत नाही. कारण आपल्याला नुसत्या जंगलाचा भय वाटतो पण त्याचं तर वन्य प्राण्यासोबत रोजचा वावर असतो. अगदी क्षुल्लक कारणावरूनही ते त्या घनदाट जंगलात जात असतात मग काय आणि कशाचं असेल त्यांना भय?

सोनापूर पाच दहा मिनिटात अंतर असेल,तर खिडकितुन पेरजागढचं शिखर अगदी स्वच्छंदपणे डोळ्यात दिसत होते. परत एकदा आडवी नजर टाकून जेव्हा मी बघितलं, तर खरंच एखाद्या महिलेला आकाशाकडे बघत निद्रावस्थेत असल्याचे चित्र डोळ्यांत साठत होतं. गाव तसं छोटं होतं त्यामुळे कुठे भरकटनार तर नव्हतोच. पण काकांचे घर माहित नसल्या कारणाने बसमधूनच मी फोन केला होता की बस स्टॉप वर येऊन राहा म्हणून. बसच्या खिडकीतूनच काका हात हलवताना दिसला आणि आपलं कोणीतरी आहे याची जाणीव झाली. शेवटी एकदाचा सोनापुरात मी दाखल झालो.

काकांचा म्हणजे घर तसं जवळच होतं. पण घरी नात्यांची अशी गुंतवणूक होती की तितकीच मजा यावी. कारण काकाला जसं काका म्हणावं तर त्यांच्या मिसेसला काकुच म्हणावं लागेल आणि बहिणी तर भाऊच म्हणतील ना. पण त्याच बहिणी जर मामा म्हटलं तर.. !!! आणि त्या म्हणूही शकत होत्या.

गावखेड्यात जुनाट परंपरा असतात. आजही काही पद्धती चालू असतात. सध्याच्या विवाह पद्धतीत तो कायदा नसतो म्हणून सतत घटस्फोट होऊन कोर्टाच्या चकरा माराव्या लागतात आणि जीवन मोडकळीस येतं. पण गवखेड्यातल्यास लग्नाची मजाच काही और असते.

काकांची सौ आईच्या माहेरातली आणि माहेरच्या नात्यात ती माझी बहीण. मग झालो की मी मुलींचा मामा त्यामुळे जर कधी गमतीची वेळ आली तर सहज म्हणायचं की मी तुम्हाला काकू म्हणायचं की ताई म्हणायचं. मग सगळे हसायला लागायचे कारण बहिणींना मामा म्हणण्यापेक्षा मला भाऊ म्हणने केव्हाही चांगले वाटायचे. असो हे प्रकरण आमचं घरचं होतं पण ज्या कामासाठी मी इथे आलो त्याचा विचार करूया.

गावठाण भाग आणि गावठी दारू. जंगलात राहणारे नेहमी मोहाची घेतात. (मोहाची म्हणजे मोहफुलापासून बनवलेले मद्य. ) त्यामुळे मी पण घेतली. गेल्यावर वार एकदम मटणावर होऊन गेला. जेवण झाल्यावर बाहेर बसलो होतो की आजूबाजूची मंडळी भरली आणि जाम गमती होऊ लागल्या. प्रत्येकासाठी नवीन असलेला मी, पण माझ्यासाठी मला नवीन काहीच वाटलं नव्हतं. दोन दिवसात मी माझी ओळख, माझं नाव असं गाजवून ठेवलं होतं.

काकाला मग एकांतात जाऊन विचारलं की काका पेरजागडावर इतक्यात जाता येईल का ?कारण आधीच ऐकलंय की फॉरेस्ट डिपार्टमेंटने ते स्थळ आपल्या ताब्यात घेतलं आहे म्हणून.

फिरायला तसं जाता येते, पण काही स्वयंपाक वगैरे म्हटलं, की त्याची परमिशन वगैरे घ्यावी लागते.

सध्या तरी मला फक्त फिरायचं आहे. कारण त्यासाठीच मी इथे आलो आहे. जितके फिरता येईल तितके फिरणार, जिथे जाता येईल तिथे जाणार.

मी तर नाही येऊ शकणार, पण एक सोबती मिळवून देतो तुला. ज्याला या जंगलाची संपूर्ण माहिती आहे. तो भेटणार तुला परवा. उद्या एक काम कर पेरजागढ फिरुन ये. चालुच असते ते.. कोणीही जाऊ शकतो तिथे....

तिथे कोणी राहात असेल तर ठीक, नाहीतर एकटं जाणेही अवघड व्हायचं. कारण जंगलात मी आधीच नवीन आहे.

अरे काही नाही होत, फक्त उद्या सकाळी आंघोळ कर, मटण वगैरे नको खाऊस. कारण ते तिथे चालत नाही.

असं का?

ते त्या जंगलाचं सत्व आहे. सत्व तुमच्या शहरी भागातलं जातं. असल्या खेड्यातलं नाही. कारण आम्ही त्यांची राखण करतो, आणि स्वतः ते सुद्धा स्वतःला जोपासत असतात.

म्हणजे?

अरे ज्या बहिणी लुप्त पावलेल्या आहेत. त्या ठिकाणी त्या अविवाहित होत्या. त्यामुळे हळद लागलेली मुले यांचं सहवास या गडाला भावत नाही. मासिक पाळी असलेल्या किंवा मास सेवन केलेल्यांना हे असलं काही तिथे चालत नाही. ते जंगलच त्याला ग्रहण करते.

म्हणजे तुमचं म्हणणं असं आहे, की यापैकी एकही वस्तू केलेली व्यक्ती असली तर त्याचं वाईट होतं.

हो... तुला काय वाटलं. नियम फक्त माणसंच बनवू शकतात. जगात सत्वाशिवाय आणखी काहीच खरं नाही. फरक फक्त इतकाच असतो, की त्याचं अस्तित्व दिसण्यापेक्षा त्याच्या असण्याला महत्त्व देते.

म्हणजे तुमचं म्हणणं असं आहे की आजही सत्व तिथे कायम आहे.

अरे हे माझे एकट्याचे बोल नाही. जनहिताचे बोल आहेत. त्यात अनुभव प्रत्येकाचाच निराळा असतो. कितीतरी जण असे

मृत्युमुखी मी माझ्या डोळ्यांनी बघितले आहे. आणि त्यात प्रत्येकांची चुकीपण आहे.

हो काका पण हेच जर जगाला सांगितलं तर काय म्हणेल जग?

जग म्हणजे काय? आपण मान्य म्हणजे जग मान्य. कारण प्रत्येकाला त्याच्या प्राणाशिवाय हवंय तरी काय असते? कारण जीवावर बेतल्याशिवाय कुणालाच त्याची चुकी दिसत नाही. शेवटी अहंकार किती वेळ चालणार. झोप आता रात्र झाली.

बरं काका.... शुभ रात्री.

लाईट बंद झाला मी मोबाईल विचकने चालू केले. कारण खेड्यातील लोक सातच्या आत घरात आणि दहा म्हणजे खाटेवर झोपून पहा अशा पद्धतीचे वातावरण असते. रात्री आपण बारा वाजेपर्यंत जागणारे, आपल्याला काय माहिती झोपण्याचे फायदे. डॉक्टरांनी म्हटले आहे की आपण रात्रीच्या वेळी आराम करतो तेव्हा आपला मेंदू पण आराम करत असतो. कारण म्हणजे आपले सगळे अवयव आराम करतात. आणि जर त्यांनाच आराम नाही मिळाला तर साहजिकच रोग उद्भवणार आहेत.

रात्री दहाला सगळी शांतता गावात पसरते. अगदी निरव शांतता. बाहेर हिंस्त्र श्वापदांचा वावर गावापर्यंत असतो. म्हणून फारसे कोणी फिरकत नाही, पण जंगलातलं एकदम साफ वातावरण मन अगदी प्रसन्न करून टाकते. रात्रीची फुलझाडे बहिणींनी दरवाज्यापाशी संगोपली होती. त्यामुळे रात्रभर सुवास पसरत होता. मनात कसलेही त्राण येत नव्हते क्षणभर असं वाटलं की आपण इथेच स्थायिक होऊन जाऊ या.

# १४)स्वारी पेरजागढाची...

तिरपीचा सूर्य केव्हाच वर निघून गेला. तरी माझी झोपेतून उठायची वेळ होईना. चूलीवरचा चहा कधीचा थंड पडून गेला होता, आणि सकाळचे आठ वाजले तरी उठायचं नाव नाही. म्हणून काकूने अंगावरील चादर ओढली, इतकं कुणी झोपतोय का... जा तोंड धुवून घे आधी... चहा थंड पडून गेलं कवाचं.

माझ्यासाठी गावाकडची मजा म्हणजे पहिल्यांदाच झाली होती. त्यामुळे पहिल्यांदा मला फार नवल वाटलं होतं. कारण आपल्याकडची सकाळ म्हणजे फक्त माझी रूम, त्या पलीकडे असलेला सूर्यनारायण बघणे कधी आयुष्यात जमलेच नाही. सगळे काही आवरता आवरता 10 केव्हा वाजून जायचे कळायचेच नाही. जेवण करून कुठे बाहेर निघावं म्हटलं तर अर्धा दिवस घरीच निघालेला असायचा. आणि इथे शेवट मीच उरलो होतो. सगळे केव्हा तयार होऊन माझी वाट बघत बसले होते. बहुदा हेच कारण

असावं की खेड्यातले लोक मजबूत काठीने खूप काळ स्वतःचं अस्तित्व टिकवून ठेवतात.

सगळे मिळून जेवण केल्यानंतर सगळे आपापल्या कामाला निघून गेले आणि मी पण स्वतःची बॅग भरून निघालो पेरजागड फिरायला. गावापासून दोन ते तीन किलोमीटर लांब होतं त्यामुळे पायी पायी त्या वाटेपाशी आलो. तिथे गेटवरच "पेरजागड" "सात बहिणींचा डोंगर" म्हणून नाव लिहिलं होतं. आणि बाजूलाच जंगल प्रशासनाने लावलेला सूचनाफलक होता,की जंगलांमध्ये वाघ बिबट अस्वल व अन्य वन्य जनावरांचा वावर असल्यामुळे कृपया जंगलामध्ये प्रवेश करू नये.

कच्चा खडकाळ रस्ता होता आणि वर जंगलात जाताना लुप्त पावत चालला होता. पण माझं काही वेगळंच होतं. रस्त्यावरूनच पेरजागडाची प्रतिमा अगदी अप्रतिम रूपाने दिसत होती. आणि मी एक स्मित पसरवून वाट चालण्यास सुरुवात केली.

गावापासून झुडपी जंगलाचा वावर होता, आणि सतत कोणी धनगर किंवा सरपण गोळा करणाऱ्या महिला असायच्या त्यामुळे मला पाहिजे तेवढी भीती वाटत नव्हती. पण जसजसं जंगलात आत

मी जात होतो तसतसे ते जंगल भयानक रौद्र रूप धारण करीत होतं. उंच उंच वृक्षांची रेल चेल सुरू झाली होती. त्यामुळे एखाद्या वाळक्या काटकीचा पायाखाली आवाज सुद्धा चेहऱ्यावर घाम ओसंडून टाकत होता.

जंगलातलं एक वेगळं अस्तित्व असतं. जंगलात प्रत्येक पावलावर असलेली भीती प्रत्येक जनावरांना सुद्धा असते. म्हणतात ना धावपळ केल्याशिवाय कुणाचं सुख पायाशी लोळण घालत नाही. तसेच तिथे जंगलात पण असतं. प्रत्येकाला स्वतःचा जीवन जपून घेण्यासाठी धावपळ करावी लागते. कारण हरीण धावपळ करते की आज जास्त जोरात पळाली तर स्वतः काही दिवस सुखाने जगेल पण तिच्या मागे धावणारा वाघ सुद्धा तोच विचार करतो की मी जरा जोराने पळालो तर सुखाने शिकार खात बसणार अर्थात धावपळ प्रत्येकाचीच आहे.

रस्त्याने जात असताना अचानकच मी ओरडलो कारण एक विशाल काय साप रस्त्यावर निपचीत पडून होता. मागच्या वेळेला मी जो साप बघितला होता तो यापेक्षा कितीतरी मोठा होता कारण तो द्रव्यावरचा पहारेकरी होता. अजगर असेल म्हणून मी त्याचे फोटोज् माझ्या मोबाईलवर घेतले पण नंतर कळलं की तो अजगर

नसून ब्लडरेटल स्नेक आहे. गावकरी त्याला "रकतटवऱ्या" असं म्हणतात आणि मी बघितलेला सात ते आठ फुटाचा तो बराच मोठा साप होता. तसा त्याच्या रक्ताचा थेंब सुद्धा विषारी आहे आणि मांसाहारी असल्यामुळे तो हल्लाही करतो नंतर असे मला माहित झाले. पण त्याने माझ्यावर कसलाच हल्ला केला नाही, आणि परत येताना तो मला दिसला सुद्धा नाही.

कितीतरी वेळ असा एकटाच मी चालत होतो आणि निसर्गाचा आस्वाद घेत होतो. निरनिराळे फुलपाखरू,अनेक पक्षांची चित्र विचित्र आवाज,वेगवेगळया वनस्पती जवळपास दोन किलोमीटर चालून झाले असेल. दुरूनच पेरजागडाचे खालचे गेट दिसू लागले पण आज ते उघडे होते,काही अंतर पुढे चालून आल्यावर आतमध्ये काही जणांची हालचाल दिसू लागली.

कसं आहे सोबतीला कुणी असलं, की समोर असलेल्या भीतीला सावरायची हिंमत दुप्पट होते. ज्यामुळे बोलण्याचालण्यात किंवा इतर गोष्टीत एकटं वाटत नाही. पण आता होतेच कोण सोबतीला. रहस्य उलगडण्यापूर्वी प्रत्येक जण आपल्याला असं कोड्यात ठेवून निघून गेला होता. आणि आता जे करायचं होतं ते

आता मीच करणार असं मनाशी निश्चय करून मी गेटच्या आतमध्ये पाऊल टाकले.

कुणीतरी मुले मजा घेण्यासाठी तिथे आले होते. बाजूलाच कडुनिंबाच्या झाडाखाली त्यांची गाडी थांबलेली होती. आणि मंदिरासमोरच्या आवारात दगडांच्या चुली पेटलेल्या दिसत होत्या. मी त्यांच्याशी बोललो वगैरे नाही आणि सरळ मंदिरात चालला गेलो. दहा मिनिटे तिथे बसून आपल्या मित्रांची आठवण करू लागलो. कारण जेव्हा आम्ही सगळे एकत्र यायचो तेव्हा सतत कुठे ना कुठे भटकंती पक्कीअसायची. जिथे तिथे फिरायचं, गप्पा मारत मस्ती करायचो.

पण आज फक्त आठवणींचं गाठोड माझ्या हृदयात जमा होतं. जीवाला जीव लावणारी मित्र असा हा एकटा जीव सोडून एकांत करून जातील असं कधीच वाटलं नव्हतं मला. आजही त्या मैत्रीची प्रसंग काळजात वारं घालत होती आणि आपण त्यांच्यासाठी येथे आलोय हे लक्षात आलं.

उठलो... क्षणभर आवारात इकडे तिकडे बघितलं. कोणीच नव्हतं. कारण स्थान जंगलात असल्यामुळे सहसा येथे कोणी

फिरकत नाही. आणि यात्रा फक्त शिवरात्रीच्या वेळेस असते. त्यामुळे इतर दिवसात इथे काय घडतंय त्याबद्दल कुणालाच काही माहिती नाही. गडावर जाण्याच्या मार्गावर उभा झालो. कृपया दारू मांस सेवन करून जाऊ नये. मासिक पाळी असलेल्या महिलांनी कृपया चढू नये. असे स्पष्टपणे तिथे लिहून ठेवलं होतं. थोडक्यात वाचलं आणि निघू लागलो. जवळपास 25 ते 30 पायऱ्या सिमेंटच्या बांधकामात होत्या. गेटच्या मागे छोटंसं बांधकाम केलेलं हनुमान मंदिर होतं. क्षणभर त्याला दंडवत केल्याप्रमाणे हात जोडले आणि निघू लागलो. दोन्ही बाजूला असलेलं घनदाट जंगल आणि मध्यंतरी दगडांचे घरंगळत असणारी अरुंद पाऊल वाट चालताना दगड घरंगळण्याचा आवाज मात्र व्हायचा. आतापर्यंत असलेली रानातली कुजबूज केव्हाच बंद झाली होती. इतकी भयानक शांतता पसरली होती की साधा सरडा त्यावरून चालत गेला तरी वाघाची चाहूल लागल्यागत मी तिकडे बघायचो.

इतका वेळ चढण चढत असल्यामुळे जरा धाप लागली होती. म्हणून बसण्यासाठी जागा बघायला लागलो. आणि समोर गणपतीची मूर्ती स्थापित केलेली मला दिसली. तिथे मूर्तीच्या मागे एका दगडावर मी थोडी विश्रांती घेतली. पाणी वगैरे पिऊन परत दगडांची ती पायवाट चढण्यास सुरुवात केली. इतक्या घनदाट

जंगलात असलेली ही भयानक शांतता नक्कीच कसल्यातरी अस्तित्वाचा मला सारखा भास करुन देत होती. नक्की कशाचा यावेळी तरी सांगू शकत नव्हतो. फक्त कुठूनतरी पक्षाचे सुरेल संगीत कानावर ऐकू येत होते. पण गडाच्या पायथ्याशी पोहोचेपर्यंत मला कुठलाच पक्षी किंवा एखादा फुलपाखरूसुद्धा आढळला नाही.

शेवटी मजल दरमजल करत धापा टाकीत बाजूला असणाऱ्या दगडांचा किंवा झाडांचा आधार घेत मी पायथ्याशी आलो. दोन ते तीन मोठ्या शिळा समोर ठेवलेल्या होत्या. त्यावर चढून मान उंचावून शिखराकडे बघु लागलो. कित्येक जागी मधमाशांचे पोळे होते. यावरून एक आठवलं की ही पोळे खाण्यासाठी अस्वल येथेच असते दऱ्याखोऱ्यात.

पायथ्याशी पोहोचल्यानंतर डाव्या बाजूला जलकुंभ आहे. तिथेच दगडावर जलकुंभ आणि खाली दिशा सूचक बान दाखवलेला आहे. हे एक तिथलं वैशिष्ट. इतक्या उंचावर असूनही पाणी कधी कमी होत नाही. हे फार आधीच मी तुम्हाला सांगितलं आहे. तिथून पाणी पिऊन घेतल्यानंतर मी मग पुढचा प्रवास करण्यासाठी निघालो. खरंतर दगडांची ती ठेवण बघून मला आश्चर्याचा आभास होत होता.

थोडा समोर गेल्यावर एक छोटीशी खोली डाव्या बाजूला होती. काय आहे ?म्हणून मी तिच्यापाशी गेलो कारण कुलूपवगैरे असं काही लावलेलं नव्हतं. उघडल्यावर आत फक्त काळोख तेवढा उरलेला होता. आणि वटवाघळे तिथे फार प्रमाणात होते. त्यामुळे मी फार आत जाण्याचा प्रयत्न केला नाही आणि परत आलो. पण ती खोली फार वेगळ्या पद्धतीने बांधली होती जेणेकरून तिथे कुणी रहात असावे या पद्धतीने. दगडांच्या खाली असलेल्या मोकळ्या जागेला दगड विटांचे बांधकाम करून एक रूम तयार केली होती. ज्यामुळे कुणालाही अगदी आत मध्ये एखादं घर असल्यासारखं वाटायचं. असो ते फक्त कुतूहल होतं.

पण आता हळूहळू मी डोंगर चढायला लागलो होतो. हळूहळू आजूबाजूचे जंगल आता खाली जाऊ लागलं होतं आणि मी उंच चढत जात होतो. कोपऱ्यावर एक छोटीशी दत्तात्रेयाची मूर्ती होती. आणि आपण आता उंचावर येत आहोत याची जाणीव होत होती. सभोवतालचा परिसर दिसू लागलं होतं. नमस्कार करून मी वर चढायला लागलो तर जवळच्या डाव्या बाजूला एक नागोबाची मूर्ती होती. त्याच्या पाया पडून मी पुन्हा सामोरे जाऊ लागलो.

आतापर्यंत मी फक्त चढण चढत होतो पण आता उघड शिढ्या होत्या आणि तिथून त्या चालू झाल्या होत्या. त्याच्या उजव्या बाजूला एक वाघोबाची छोटीशी मूर्ती स्थापित केली होती आणि मागेच सांगितले की हीच ती जागा आहे. त्याच्याखाली वाघाचे वास्तव्य असते. सहज मी थोडक्यात एका मोठ्या दगडावर उभा होऊन जरा वाकून बघू लागलो. तर खाली असलेली दरी थोडी फार फक्त दिसत होती. खाली पाण्याच्या आधाराने असलेली माकडे मात्र झाडावर जिकडे तिकडे उड्या मारत होते.

30 ते 40 शिड्या चढल्यानंतर सात बहिणींचे ते छोटेसे देवस्थान दिसलं ज्याच्या नावाने ते गड होतं. पण यावेळेस तिथे पूजा करायला किंवा तिचे गीत गायला कोणी नव्हते. मी एकटाच त्या गडावर होतो. दगडांमध्ये उमटवलेल्या त्यांच्या छव्या होत्या. अलीकडे भाविकांचे एक चांगल्या प्रकारे असलेले श्रद्धास्थान असल्यामुळे तेथे दानपेटीची आणि नवीन मुर्त्यांची पण सोय झाली होती. पण गावकरी म्हणतात की दगडांत विलीन झालेली ती सात बहिणीची स्मारके ज्यांची बहिणींवर श्रद्धा आहे त्यांनाच दिसतात. इतरांना फक्त दगड दिसतो. त्या दगडांच्या भोवताल एक कठडा पण उभारला होता. ज्यामुळे कुणी श्रध्देची नास्तिक अवहेलना करू नये

म्हणून. दगडांमध्ये असलेल्या त्या सातही बहिणींचे दर्शन घेऊन मी समोर असलेल्या मोकळ्या दगडांवर जाऊन बसलो.

आजूबाजूचा सभोवार प्रदेश, हिरवंगार रान, डोंगर-दऱ्या, तलाव, छोटी-छोटी जंगलात असलेली गावे अशी स्पष्टपणे दिसत होती. एकच छान ते दृश्य होतं की त्यावरून माझी नजर हटत नव्हती. असं वाटत होतं की एखाद्या ढगावर उडी मारून घ्यावी आणि संबंध रान फिरून यावं.

पाच-दहा मिनिटांचा डोळ्यांना आस्वाद घेऊन मी मग उजव्या बाजूला गडावर जाणाऱ्या रस्त्याला लागलो. गडाच्या काठाकाठाने पाऊलवाट चाललेली होती. दगडे अशा पद्धतीने तिथे वसलेले होते की ज्यांचा तोल कधीही जाऊ शकतो. कारण कित्येक बाजूने ते गड उघड्या प्रमाणे पडले होते. आतमध्ये एकदम पोकळ असल्यासारखे. काही अंतर गेल्यावर एक पहिला कोपरा लागला. दुरून बघताना आपल्याला त्या कोपऱ्याची जाणीव होत नाही. कारण नजरेला समांतर असलेला तो कोपरा आधाराने अडकून पडलेला होता आणि हिरव्यागार गवताने आपली पालवी विस्तारून त्याला झाकून टाकले होते. त्यामुळे समोर दरी आहे हे आपल्याला जवळ गेल्याशिवाय माहिती होत नाही.

हे खरंच भीतीदायक आहे... मी स्वतःशीच म्हटलं. कारण खाली बघताना माणूस वाचण्याची शक्यता तर कमीच, पण तो सापडणे देखील कठीण आहे. याची वाच्यता येत होती. फक्त वडाच्या पारंब्यांनी दगड घट्ट पकडल्यागत आपली मुळे जिथे-तिथे पसरवली होती.

चालताना फक्त नजरेत भरत होतं ते दगडाचे उंचच-उंच दगडमहाल. कारण ते उभं होतं, असं काही संतुलन असल्यासारखं. प्रत्येक लहान दगडांनी मोठ्या दगडांना अडकवून ठेवलं होतं. प्रत्येक दगड एकमेकांना घट्ट पकडून असल्यासारखं होतं. सारखी रस्ते तयार झाली होती आणि अशी कितीतरी रस्ते चालताना रस्त्याच्या बाजूलाच असलेल्या स्थितीत होते. त्यामुळे सारखी अस्वलाची भीती मला जाणवत होती. कारण असल्या खोऱ्यात जास्त करून तिचे अस्तित्व असायचे.

वाघापेक्षा अस्वलही फार हिंसक जनावराची जात आहे. कारण भीतीपोटी वाघ सुद्धा शिकार सोडून पळून जातो, पण अस्वल मात्र घाबरत नाही. लोखंडाचा आधार घेऊन आपल्या शरीराची हाडे फोडली जातात पण तिच्या नखात अशी काय ताकद

असते, की ती आपलं डोकं सुद्धा फोडून टाकू शकते. त्यामुळे अस्वलाला फार प्रमाणात भीत असतात.

थोडा आणखी सामोरे गेल्यावर एक खोल दरी आली. मला वाटते यालाच "हत्तीखोयाळ" म्हणतात. तर कदाचित तो हाच असावा... पूर्वी लोक एखाद्या विशिष्ट वस्तूला व्यक्तीला त्याच्या त्या कारणावरून नाव द्यायचे. आता ही एक त्यातलीच गणना होती. एक हत्ती आरामात खाली जाऊ शकत होता, ज्यामुळे त्याला कदाचित असे नाव असायला पाहिजे असे मला वाटते. कारण अत्यंत खोल असणारी ती दरी तेवढेच निरुंद अशी वाटत होती. आणि आत मधून तशी ती वाढतच गेल्यामुळे वरच्या बाजूने आत मधलं असं काहीच दिसत नव्हतं.

गडावर जायची पाऊलवाट मात्र आपल्याला तिथून फिरून जावे लागते. तसं त्या दरीची खोलाई वरून इतकी खोल वाटत होती की जणू ते कुठेतरी जाण्याचा मार्ग असावा असं वाटत होतं. आणि दरी वरून जाताना रस्ता म्हणजे दरीत अडकलेली मोठी मोठी दगडे होती. तिथून तो रस्ता मी पार केला, आणि समोर आपली वाट चालण्यास सुरुवात केली. कारण आता गडावर जायची वाट आता जवळच आली होती. आणि आतापर्यंत अर्धा मैल गडाची मी

पायपीट केव्हाच केली होती. हत्तीखोयाळ पासून अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरावर एक कोपरा लागला. ज्यात मागे मी सांगितल्याप्रमाणे एक विशालकाय दगड आपल्या वाटेतच समतोल होऊन पडला आहे. आधीच दगडांचं विस्तीर्ण आश्चर्य बघून कुणीही थक्क होऊन जाईल. आणि त्यात भर म्हणजे पुन्हा बॅलन्स झालेले दगड. एका छोट्याशा दगडाच्या आधाराने त्याला थांबवून ठेवलं होतं. बघणाऱ्याला या पद्धतीत वाटत होते की जणू तो दगड आत्ता घसरेल की नंतर घसरेल, पण इतके वादळ सोसूनही त्या दगडाची भूमिका जशीच्या तशीच आहे आजतागायत.

निसर्गाचे रूप विविध तऱ्हेने या जगात उपलब्ध आहेत याची जाणीव या हाडामासाचा माणूस कधी करणार नाही. कारण निसर्ग म्हणजे एक नियम आहे. एक प्रकारचा देव आहे, ज्याचे महत्व माझ्यामते आज तरी माणूस समजलं नाही आहे. फक्त ओली दुष्काळ आणि कोरडा दुष्काळ याच्या व्यतिरिक्त त्याला काहीच कळत नाही.

संतुलन असलेल्या दगडापासून तरी गड चढण्याच्या शिड्या अजून दहा मिनिटांचे अंतर मागते. आणि एक शेवटची कॉर्नर असते त्या कोपऱ्यात. वरून एकदम अरूंद अशी पाऊलवाट आहे. कारण

घसरणीचा भाग असल्यामुळे आपल्याला फार सांभाळून जावे लागते. जर प्रतिव्यक्ती समोरून येणारा असेल तर दोघांपैकी कुणा एकाला तरी थांबावं लागतं. हा शेवटचा टप्पा आहे, तिथून उभारत असलेल्या पाच ते दहा दगडामधे कोरलेल्या शिड्या आहेत या थेट आपल्याला गडावर घेऊन जातात.

गर्दी तर कुणाचीच नव्हती, पण जरा भीतभीतच मी गडावर चढलो होतो. कारण थंडीचे दिवस अजून संपले नव्हते. थोडी-थोडी झाडांची पाने मात्र गळायला लागली होती. पण डोंगराळ कपाळावर असलेली कुरणे अजून तरी पिवळसर हिरवी होती. कुरणांमधून एक छोटीशी पायवाट रमलेली होती. मी त्या पायवाटेने जरा भीतभीतच सामोरी जात होतो. तिथे सहसा कोणत्या जनावराची भिती नव्हती. पण माणूस जेव्हा एकटा असतो ना तर एक हवेचा झोका पण त्याच्या अंगावर काटा उभा करतो, आणि आधीच मी त्यात नवीन.

समोर तो रस्ता एका मंदिरापाशी येऊन थांबला. मंदिर ते बंद होतं आत मध्ये तसं काहीच नव्हतं. पूर्वी म्हणे याच मंदिरात काही मूर्त्या होत्या, पण कालांतराने आत मधले सगळे दैवत्व बाहेरच स्थापित केल्या गेलं. एका पाषाणावर शिव शंकराची मूर्ती तयार

केली होती. बाजूलाच नंदीबैलाची वगैरे अशा दोन तीन मुर्त्या मंदिरा समोरच्या प्रांगणात होत्या. त्यांचे दर्शन घेऊन मी काठावर असलेल्या बाजूला गेलो तर दुरवरचा प्रदेश स्वच्छपणे डोळ्यात दिसत होता. पायी येताना सोनापूर आपण किती मागे सोडले याची जाणीव झाली. पुन्हा सोनापूरच्या जवळपास असलेले काही गाव पण दिसत होते.

इतक्यात कुणीतरी एखादी महिला रडत असल्यासारखा आवाज येत होता. मी थोडा वाकुन बाजूच्या झाडीच्या खाली बघू लागलो. कारण त्यातूनच तो आवाज येत होता. जवळपास कुठेतरी अस्वल होतं, इतकं मात्र नक्कीच. म्हणून कसलाही आवाज न करता मी गुपचूप काठाकाठाने तिकडे भावाची डोंगरी म्हणतात त्या बाजूला गेलो. मागच्या वेळेला काही लोकांनी लवकर उतरण्यासाठी एक खिंड आहे म्हटलं तिथे गेलो.

जंगलाचं विविध रूप तिथे दिसत होतं. आणि कोसळलं डोंगरसुद्धा अगदी डोळ्यात दिसत होतं. काठाकाठाने चालत मग एका दगडापाशी आलो, ती एक छोटीशी विहीर असल्यासारखी होती. ज्यात मध्यभागी एक शेंदूर भासलेला दगड होता. तो कशाचा

आहे म्हणून मला कळलं नाही पण त्याचं फोटो घेऊन मी चालू लागलो.

देवस्थानाला भेट देणाऱ्यापैकी काही लोकांनी दिलेल्या मूर्तींची स्थापना, तिथे एक दोन ठिकाणी दिसली. त्या जलाशयापासून अख्ख्या पर्वतरांगा दिसत होत्या. मुक्ताईला असलेली डोंगररांग पेरजागडावरून विशाल काय होत गेलेली होती. ही डोंगररांग थोड्याफार प्रमाणात घोडाझरी तलाव आपल्याला दिसत होता तिथपर्यंत दिसते. बऱ्याच जंगलाचा दर्शन इथून मोकळेपणानं करता येत होतं. त्यामुळे काठावर असलेल्या एका छोट्याशा दगडावर बसून मी एका निर्विकार नजरेने त्या जंगलाकडे बघत होतो. आकाशातलं ऊन सावलीचा खेळ बघून गमतीशीर वाटायचं. ढगांची ती छाया काही काही भागात अक्राविक्राळ रूप दाखवायची. पण माझ्या मनात एक निराळाच चक्र चालू होता.

कारण आज आपण गडावर आलोय, पण यातलं मला काहीच कळण्यासारखं वाटलं नव्हतं. कारण ज्या रहस्याचा उलगडा करायचं होतं. तिथे फक्त माझी दृष्टी जात होती आणि ती पण नाहीच्याबरोबर. मी जिथे बसून होतो तिथूनच काहीतरी मार्ग

काढण्याचा प्रयत्न करावा म्हणून, मी बॅग काढली. पाण्याची बॉटल काढून दोन ते तीन घोट घशात कोंबले आणि ते ताम्रपत्र बाहेर काढून, त्यावरचे निशान बघू लागलो. मी जिथे बसून आहे त्याची नोंद घेतली.

कारण जिथे मी बसून होतो. तो पेरजागडाचा तुकडा अगदी निर्विकारपणे अलग काढावा तर तीन संभाव्य चिन्ह माझ्या समोर उपस्थित झाले होते. ज्या बाजूला सारंगडचा तलाव दिसून येत होता. त्या बाजूला एक शंखाची कलाकृती दिसत होती. आणि मधल्या विस्तीर्ण जंगलाच्या परिसरात एक आदिमानवाची कलाकृती होती. आणि तिसऱ्या बाजूला भावाची डोंगरी असते त्या बाजूला ती त्रिशुलाची कलाकृती होती. आणि त्यातच त्यांच्या ही वरच्या बाजूला एका मोठ्या माणसाची कलाकृती दिसत होती. अशा बऱ्याच कलाकृती दिसत होत्या. पण अजूनही मला त्याचा उलगडा होत नव्हता. कुठे लाल चिन्हाची खून होती तर कुठे कुठे गोल वर्तुळात चौकोन कोरला गेला होता. एकीकडे विस्तीर्ण जंगल माझ्या डोळ्यासमोर उभा होता आणि त्यातच त्याचं एक रूप माझ्या हातात होतं.

त्यां नक्षात बऱ्याच काही कलाकृती दाखवत होत्या. पण त्यांचं काय करावं? हेच मला समजत नव्हतं. तितक्यात बाजूच्या

खडकावर काहीतरी हालचाल झाल्यासारखं मला जाणवलं. आणि नक्षा कोंबून बॅगेत टाकला. तसं इतक्यात झालेल्या मृत्यूच्या प्रसंगाने माझ्यातली भीती फारच प्रमाणात घालवली होती. पण मी काही देव माणूस नव्हतो. त्यामुळे मग सभोवार नजर पसरवली. तो फक्त एक आभास आहे लक्षात आलं, आणि मी परतीचा मार्ग पत्करला.

बाहेरूनच बघितल्यावर असं कधीच वाटलं नव्हतं, की गडाच्यावर एखादं गाव बसेल इतकी सपाट जागा आहे म्हणून. पण त्यात मातीचा अंश फार कमी प्रमाणात होता. सगळ्यात जास्त दगडांचा त्यात समावेश होता. मध्यंतरी झाडाझुडपांची काही मात्रा होती. ज्यामुळे गडाच्या त्या पलीकडल्या भागात यावेळेस एकटेदुकटे तरी जायची हिंमत नव्हती. त्यामुळे कसलाही विचार न करता मी गवतातून वाट काढत मंदिराच्या समोर आलो.

शेवटच्या अगदी महादेवाच्या मूर्ती समोर आलो. आणि हात जोडून परतीचा मार्ग धरला. येताना जी भीती जाणवत होती ती आता गड उतरताना भासत नव्हती. आणि चेहऱ्यावर कसलीच संवेदना पण नव्हती. त्यामुळे मी चाललो होतो तसा आता कुणीतरी सोबत आहे असं वाटत होतं.

हत्तीखोयाळात आणि दोन्ही कोपरे पार करून बहिणींच्या मंदिरापाशी आलो. चालतोय बहिणींनो... अशी प्रेमळ हाक दिली. आणि परत माघारी फिरलो. कारण खूप वेळ झाला होता. आणि सायंकाळच्या आत गावांमध्ये पोहोचणे आवश्यक होते. नुकतेच मनगटावर बघितले तर साडे तीन वाजून गेले होते.

जंगलाचं कसं असतं. सकाळी सूर्य जसा उगवतो तसं तसं वन्यप्राणी जंगलाच्या आत जातात आणि सायंकाळच्या सुमारास जेव्हा सूर्यप्रकाश लुप्त पावते तसं वन्यप्राणी गावच्या आसऱ्याने निघून येतात. रस्त्यावर येऊन बसतात. त्यामुळे जंगलात कधी या प्रहरी कधीच थांबू नये. आणि सायंकाळचा सुमार हा लवकरच संपतो. वर थंडीचे दिवसही जरा लहानच असतात त्यामुळे अंधारायला लवकर होत असते.

तरीपण गडावरून उतरताना थोड्याफार जलद गतीने येत होतो. अचानक वाघोबाच्या जवळ आल्यावर कसलीतरी दुर्गंधी येत होती. रात्री त्याबद्दल काकाने मला सांगितलं होतं, की त्या खाली त्याचं पहारा असतो. थोडाफार उंचावून बघितले तर मघाशी असलेली वानरे पण नव्हती. जवळपास कुठेतरी वाघ असल्याची

खात्री मात्र होती. त्यामुळे आवाज न करता थोडासा त्वरेने मी चालु लागलो. एकदम जलकुंभापर्यंत येईपर्यंत दम सोडला नाही. पण खरंतर जलकुंभापासूनच जंगलातून पायवाट होती. अचानक मागाहून छम छम असा पैंजणांचा आवाज यायला सुरु झाला. मी मागे वळून बघावं तर दृष्टिक्षेपात अशी एकही वस्तू आढळत नव्हती कि तिचं ध्वनि निघावं. पण नंतर चालताना सातत्याने त्या आवाजाचा पाठलाग मात्र माझ्या मागे होता. त्यामुळे मी फारसं न थांबता परत चालायला सुरुवात केली होती.

ज्यावेळेस चालताना गडावर आजूबाजूला दृष्टी टाकत मी गडावर गेलो होतो. त्यावेळेस तो आवाज माझ्यापासून दूर व्हावा यासाठी प्रयत्न करत होतो. पण जसे मी थांबायचो तसा तो आवाज थांबायचा. चालू लागलो की परत मागावर यायचा. अशा पद्धतीने मी गणपतीच्या मूर्तीपर्यंत पोचलो. काही क्षण तिथे थांबून मी पालटुन बघू लागलो. कोण असेल ते असे समोर येईल म्हणून. पण कोणीच आलं नाही. पाच-दहा मिनिटं शांत वातावरण होतं. अगदी चिटपाखराचासुद्धा आवाज येत नव्हता.

शेवटी कंटाळून मी परत चालायला लागलो. आणि ते छम छम अगदी स्पष्टपणे माझ्या पाठीमागे येऊ लागले. मी घाबरलो तर

नव्हतो. पण कदाचित उत्सुकता म्हणून, प्रत्येक आवाजाच्या मागोमाग मी मागे वळून बघत होतो. जाताना ज्या अस्तित्वाची जाणीव होत होती. कदाचित ती जाणीव बहुदा आता आवाजाच्या रूपाने माझ्या कानावर येत होती.

अगदी गडावरून तो आवाज खाली असलेल्या गेटपर्यंत ऐकू आला होता. मंदिराच्या खाली असलेल्या आवारात प्रवेश करताच तो आवाज आपोआप लुप्त झाला. इकडेतिकडे लक्ष देताच मंदिरात एक गृहस्थ दिसला आणि थोडं हायसं वाटलं. मी त्याच्या कडे जाऊ लागलो. तो इथेच राहणारा असेल, त्यामुळे त्याला काही माहिती असेल. याबाबत असे मला वाटले होते. कारण मघाशी इथे मला त्या पिकनिक करणाऱ्या मुलांशिवाय कोणीच आढळले नव्हते. त्यांच्या जवळ गेल्यावर त्याने कोण? कुठला? त्याबद्दल चौकशी केली. पण उलट मी त्याला विचारले, की इथलं सत्व काय आहे? तुम्ही इथे एकटेच असतात तेव्हा त्याबद्दल तुम्हाला काहीतरी जाणवते का?

ट्रस्टतर्फे मंदिराची देखभाल तो तिथे राहून करायचा. यासाठी त्याला एक खोली आणि अन्नपाण्याची तशी सोय करण्यात आली होती. पण पाण्याअभावी इथे त्याचे बरेच हाल व्हायचे. त्यामुळे तो

फार त्रासून गेला होता. पण त्याने सांगितलेली ती माहिती जरा विचित्र वाटली.

तो सांगू लागला की त्या ज्या सात बहिणी आहेत. त्या बाजूला असलेला नवतळा नावाचे गाव आहे तिथल्या माना जातीच्या मुली आहेत. त्या इथे आल्या होत्या. आणि त्यांचं नाव या गडाला देण्यात आलं होतं. पण नेमकं पुढे काय झालं? असं काय घडलं? त्यांच्याबद्दल मलाही काहीच ठाऊक नाही. एक मात्र होतं की त्या गडाविषयी प्रत्येक जण एकच म्हणायचा की बहीण रडते तर तिचं डोंगर चढते आणि भाऊ हसते तर त्याचं डोंगर कोसळते... आणि ते सगळं बरोबरच होतं. कारण बुजुर्गमंडळींनी म्हटल्याप्रमाणे बहिणींच डोंगर चढलेलं होतं आणि बाजूला असलेल्या भावाचा डोंगर बऱ्याच प्रमाणात कोसळलं होतं. पण त्याचा खरा अर्थ काय हेच मला ठाउक नव्हतं.

परत त्याने असंही सांगितलं होतं, की त्या सातही बहिणी एका झाडाची पूजा करायची. पण काही वात्रट लोकांनी ते झाड सुद्धा कुऱ्हाडीने तोडले होते. पण आश्चर्य असं होतं, की त्या झाडातून रक्त गळू लागलं होतं. त्याला घाबरून ती लोक पळून गेली होती. मग जेव्हा बहिणी त्या झाडाची पूजा करण्यासाठी तेथे

गेल्या, तेव्हा ते तुटलेले झाड आणि त्यावरचे लाल रंगाचे रक्त पाहून त्यांची माया दुखावली. आणि त्यांनी त्या लोकांना श्राप दिले. असं पण त्याने मला सांगितले. पण खरं तर विश्वास मला अजूनही वाटत नव्हता. कारण त्या ज्या स्वरूपात होत्या कधी कुणी बघितलं तर माहित नाही. बस फक्त जे आहे ते आहे.

त्यांचं म्हणणं होतं की सत्व आहे इथे. प्रत्येकाला असं दिसून येण्याचं कारण नव्हतं. आणि नियमांचे उल्लंघन करणारे आपल्याला कुठेही मिळतात. अगदी शैक्षणिक पात्रतेचे सुद्धा ज्याचे अनुकरण तो मला सांगत होता. असे कित्येक ताजे उदाहरण त्याने सांगितले जे मला वृत्तपत्रांमधून किंवा व्हाट्सअपच्या माध्यमातून आज पर्यंत मी ऐकत आलो होतो. तसा अपघात काही वेळा नकळत घडते पण त्याने प्रत्येक गोष्टीचा उलगडा एका ठोक कारणावरून केला. प्रत्येक अपघाताचं कारण त्याने सांगितलं आणि तेसुद्धा सांगितलं की कुणी काय चूक केली होती? कुणी कसं काय केलं होतं? मला त्याचं असं पटलं तर नाही पण त्याच्या समाधानाकरिता मी हो ला हो केलं. आणि तसे एक शेवटचा प्रश्न त्याला विचारला की या गडाची सुरुवात कशी झाली म्हणजे सगळ्यात आधी या सत्वाची कुणालातरी प्रचीती आलीच असेल ना.

शेवटचा तो बोलला तर अगदी समाधान करण्यासारखं बोलला त्याने जे सांगितलं त्यावरून तर नक्कीच असं वाटू लागलं होतं की आपण योग्य त्या मार्गावर चाललो आहोत. कारण झालेल्या असामान्य गोष्टींना एखादी असामान्य गोष्ट साध्य करू शकते आणि त्याचा खुलासा त्याने नकळतपणे केला होता.

बोलण्याच्या ओघात किती वेळ होऊन गेली मला काही कळलच नाही पण सूर्याची किरणे आता जागा सोडायला लागली होती. त्यामुळे मग मी त्याचा निरोप घेण्याचं ठरवलं. कारण येथे मी एकटाच होतो. तसेच आता एकटाच जाणारसुद्धा होतो आणि गड फिरताना बराच वेळ मी लावला होता. निघताना एक नजर गडावर टाकली आणि मनात विचार करत करत मी गावाकडे जाण्याची तयारी केली. गेटच्या बाहेर आलो असून रस्ता माझी वाटच बघत होता. पण एक प्रश्नचिन्ह उरलेला होता. मघाशी आपण जे अनुभवलं ते शेवटी काय होतं? कारण जर का ही गोष्ट सांगितली असती तर तो गृहस्थ सगळी त्या सात बहिणीची महिमा आहे असं म्हणाला असता. पण काय खरंच शेवटच्या पायरीपर्यंत त्या मला सोडायला आल्या होत्या. मग असं होतं तर त्या सर्व माझ्या

सोबतीला स्पष्टपणे दिसल्या असत्या. अश्या गुप्तपणे का संचारत होत्या.

शेवटी आभास तो आभास. कारण आभास हा भासुन घ्यायचा असतो. सत्व इतक्या सहजासहजी लोकांना मिळालं असतं तर जो तो आज अद्वितीय शक्तीचा किंवा धन द्रव्याचा मालक असता. त्यामुळे आभासणे सुद्धा माझ्या मते फार सात्विकतेचे प्रमाण आहे याची प्रचिती फारच कमी लोकांना येते.

त्याने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीत नक्कीच काहीतरी तथ्य वाटत होता. त्यामुळे मला प्रत्येक गोष्ट डोळ्यांनी बघितल्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता. आणि मी एक गडप्रेमी आहे हे कितीतरी लोकांना ठाऊक होतं.

रस्त्याने जाताना सूर्य केव्हाच अस्ताला जात होता आणि रस्ता अजूनही जरा लांब होता. तितक्यात काकांनीच फोन केला... कुठे आहेस म्हणून? मी म्हटलं... येतोय रस्त्यात आहे.

# १५) रितुला ताईत मिळणे...

इन्स्पेक्टर राठोड... जेव्हापासून त्यांनी माझ्या केस वर लक्ष द्यायची वेळा चालू केली होती. तेव्हापासून त्यांच्या जीवनात एक वेगळाच प्रवास चालू झाला होता. कधी त्यांनाही वाटले नव्हते की जगात अस्तित्वाच्या बाहेरही विशाल जग आहे . कारण दंतकथेपेक्षा तंतोतंत उदाहरण त्यांना फार अधिक प्रमाणात आवडायचे. आणि मला वाटते फक्त साक्षात्कार व्हायचा बाकी होता.

तसं राठोडला म्हणजे पोलिसांना बघण्याचा प्रत्येक गावकऱ्यांचा एक वेगळा दृष्टिकोन असतो. त्यामुळे साधा माणूस जेवढा जनसामान्यात मिसळून हवी ती माहिती काढून घेतो तसे ह्या पोलिसाला जमले नसते. पण प्रयत्न त्यांचे चालू होते. मी कोणाची भेट घेतली? कुठे वगैरे जायचो? वगैरे वगैरे अशा बऱ्याच गोष्टी त्यांनी नोंदी केल्या होत्या. आणि दुसऱ्या दिवशी पेरजागडावर जाण्याचा बेत करून तो आपल्या घरी चालला आला.

उद्या सुट्टीचा दिवस आहे असे म्हणत, त्याने सकाळी सकाळीच चिकन घरी आणली आणि मस्तपैकी जेवण करून सोबत्याला फोन केला.

कोण नागरे बोलतोय का?उद्या आपल्याला पेरजागडावर जायचंय. त्या प्रकरणी शिंदे यांना फोन लावा आणि त्या भिडेलासुद्धा बोलवा. सगळ्यांना पोलिस चौकीजवळ व्हायला सांगा. लवकरात लवकर हे प्रकरण संपवायला हवं. कळलं ना.... मग चला लागा तयारीला.

इकडे माझी प्रकृती दिवसेंदिवस अशा पद्धतीने खालावत चालली होती, की जणू अंगावरचं मांस कोणी ओढून नेत आहे. कारण जागोजागी पडलेल्या जखमा आणि हाडांचा सापळा तेवढा उरला होता. प्रत्येक डॉक्टर रितूला देवाच्या प्रतिमेकडे बोट दाखवत होता. आणि तीही बिचारी रोज गंगायमुना गाळत माझ्या जीवाची अभिलाषा धरून होती. एक विश्वास जो आजही तिच्या मनामध्ये जिवंत होता. एक अतुट धागा आजपर्यंत ती विणत आली होती. शेवटच्या शब्दाच्या धीराने आजही ती माझ्यात गुंतलेली होती. अगदी स्वतःच्या शेवटच्या श्वासापर्यंत.

कधी वाटलं सुद्धा नसेल तिला, की माझ्या प्रेमाची अनुराधा जपताना तिला इतक्या विशाल यातनांना सामोरे जावे लागेल. सुख म्हणता म्हणता दुःखाच्या कितीतरी रात्री तिने सोसून काढल्या होत्या. फक्त एका विश्वासावर माझ्या परत येण्यावर.

शेवटी एका स्त्रीचं मन कोणीच जाणू शकत नाही हे मात्र खरं आहे. कारण बघा ना तिच्यासाठी केलेला त्याग सुद्धा तिला माझ्यातून घालवू शकला नाही. चार चौघात केलेला अपमान सुद्धा तिच्या प्रेमाला तडा देऊ शकला नाही. इतक्या विश्वासावर तर ती सती बनुन मृत्यू देवाकडून सुद्धा माझे प्राण आणू शकत होती. आजच्या या धावपळीच्या युगात खरं प्रेम काय असतं? हे जर कुणाला विचारलं तर लोकं हसतात. कारण प्रेमाला खरं करण्याची तेव्हढी फुरसत उरली कुठे? सगळे टाइमपास समझतात. आणि टाईमपासच करतात.

वासनेने बरबटलेले डोळेही त्यांना नशिले वाटू लागतात. शरीर वासनेचं सुख म्हणजे प्रेम,आणि कंटाळा आला की मग प्रेमभंग, आणि मग चालते विरह, यातना, दुःख. पण लोकांना समजत कसं नाही. एवढं सगळं करताना आपल्यात असणारे प्रेम हे उरलंच कुठे होतं. याची जाणीव कधीच करणार नाही. फक्त धोका

दिला म्हणून आत्महत्या करतील. नाहीतर बदला म्हणून त्यांचं बरं वाईट करून तुरुंगामध्ये जातील. पण तेच प्रेम असं निष्काम असेल तर काय जग सोबतीला नसेल. ज्याला अख्ख्या जगाने स्वीकार केलाय त्याला अपवाद काय करणार आणि कोण करणार? पण कुणी त्या गोष्टीचा कधीच विचार करणार नाही.

माझं प्रेम टिकवण्यासाठी आयुष्याला एक लाभलेला धागा होता रितू. कारण ती नुसतं प्रेमच नाही तर तिच्यात मला जीवन लाभलं असं म्हणू शकतो. कारण एक स्त्री असते माणसाला घडवणारी, आणि तुडवणारी पण. माझ्या तप्त आणि क्रुश देहाकडे बघत न जाणे कोणत्या विचारात असायची. तासनतास तिलाच ठाऊक. त्या दिवशी आईच्या हट्टामुळे इतक्या दिवसापोटी हॉस्पिटलच्या बाहेर आली होती. नवीन रुग्ण किंवा त्यांचे आप्तगण रडतांना बघून तिच्यात कसलीच प्रक्रिया होत नव्हती. कारण मृत्युपणाचा आव आणून ती किती रडत असते कदाचित याचा अंदाज लावू शकत नव्हतो. तिच्या डोळ्यांना अशी शिक्षा का व्हावी? याचे उत्तर मात्र सतत ती त्याला मागत होती. खरं तर माझ्यावाचून तिला राहणे अवघड होतं, पण झालेल्या इतक्या दिवसांच्या बैठकीत मुलींच्या मनावर कसले दडपण नको यायला म्हणून आईने तिला बाहेर जबरदस्तीने पाठवले होते. कारण

इतक्यात रितुला बाहेरच्या जगाचा विसर पडला होता. मला ठेवलं होतं तेच तिची रूम आणि सर्वस्व काही झालं होतं.

आज उन्हाची प्रखर किरणे तिला बघवत नव्हती. त्यामुळे जरा चालत ती आवारात असलेल्या बदामाच्या झाडाखाली येऊन बसली. येणाऱ्या जाणाऱ्याकडे कुठेही न बघता बुंध्यावर पाय वर छातीशी घेतले. आणि दोन्ही पाय छातीच्या जवळपास घेऊन स्वतःचा चेहरा त्यात लपवून घेतला. स्वतःला कैद करून टाकलं तिने. या धावपळीत नको होता तिला कुणाचा हसरा चेहरा, फक्त माझी आठवण आणि एकांत. कारण माझ्या सोबत जोडलेलं तिचं अस्तित्व मला वगळून काहीच नव्हतं.

न जाने कितीवेळ दुःखाच्या प्रखर निराशेत ती तिथे बसून होती. बदामाच्या झाडाला बुंधा बांधलेला असल्यामुळे येणारा जाणारा सावलीसाठी अलगद त्यावर जाऊन बसायचा. आणि सहज कुणाची लक्ष जाईल तरी समजून घ्यायचं की हॉस्पिटलमध्ये कुणीतरी ॲडमिट असावा. पण यावेळेस ज्याचं आभास झालं तो तिला बघून उठला नाही तर तिला ऐकू येईल अशा पद्धतीने तो तिला बोलू लागला.

दुःख उराशी आहेत, पण धीर सोडू नको बाळा. उतार-चढाव प्रत्येकाच्याच आयुष्यात आहे. जातील दुःख, हे ही अगदी तळाशी जातील, तो निघालाय प्रवासाला कारण स्वतःची ओळख करताना चुकला होता. तो मिळेल तुला.. डोळे उघड मुली, मिळेल तो तुला, पेरजागडावरून नक्की येईल.

पेरजागडाचे नाव घेतलं तसं रितूच्या मनात चांदणे चमकले. तिने डोळे उघडले पण तिला आतापर्यंतचा ज्याचा आवाज भिरभिरत होता किंवा कानापाशी घोंगावत होता असं काहीच तिच्याजवळ नव्हतं. पण तिच्या बाजूला एक ताईत ठेवून होता. तिने अचूक हेरले की आत्ता झालेला आभास काही साधासुधा नव्हता. नक्की कशाचा तरी निमित्त होता. आणि ताईत उचलून ती उभी झाली व तिथून पवनच्या रूमकडे जलद गतीने निघायला लागली.

नुकतेच डॉक्टर चेकअप करून निघून गेले होते आणि आई माझ्यापाशी बसून आसवें टिपत होती. केव्हा उठशील रे माझ्या राजा.. म्हणून सारखी मला विचारत होती. आई म्हणून रितुने तिच्याकडे झेप घेतली आणि दोघे पुन्हा एकदा अश्रुंच्या पावसात ओलेचिंब झाल्या. नंतर रितुने बाहेर घडलेली हकीकत तिला

सांगितली आणि आईने तो ताईत माझ्या उजव्या हाताच्या दंडावर बांधला. कारण हे सगळं माझेच बोल होते की "माणसाने सगळं करून सोडावं पण कधी सोडून करू नये". देव प्रत्येकाच्या पाठीशी असतो असं नाही, पण धडपड करणाऱ्याच्या तर नक्कीच असतो. आज त्या बोलण्याला यश आलं होतं.

रोजच्यासारखं मग रितुने आईला घरी पाठवले आणि माझ्यापाशी ती येऊन बसली. बसल्या बसल्या ती विचार करू लागली त्या गोष्टीवर कोण असेल तो? कोणीही असो. पण ताईतला यश येवो. माझा पवन मला माझ्या जवळ येऊ दे, इतकीच प्रार्थना.

## १६)शेवटी रितूचा विश्वास जिंकला...

इकडे इन्स्पेक्टर राठोड आज जरा सुट्टीवर होता. सुट्टीचा दिवस असल्यामुळे आज परत त्याने चिकन बनवली होती. त्यामुळे त्यालाच पोलीस चौकीवर पोचायला वेळ झाला होता. अन्यथा सगळेजण केव्हाच पोचले होते. मागाहून जाऊन सुद्धा इतरांवर जरा राठोड खेकसला.

माझ्या अगोदर येऊन जमा झाले. चांगली गोष्ट आहे. पण इथे तोंड काय पाहता माझं. काढा ती जीप. आपण येथे कशासाठी जमलोय हे ठाऊक नाही काय तुम्हाला? चला लवकर.. तोंड बघताय नुसती...

आणि पोलीस चौकीतून गाडी निघाली पेरजागडाच्या दिशेने. काही तासात सोनापूर ओलांडून गाडी पेरजागडाच्या खालच्या आवारात जमा झाली. रोजच्या सारखं तसं गडावर कोणी नव्हतं. मंदिरात असणारा गृहस्थ पिण्याच्या पाण्यासाठी गावाकडे गेला

असल्यामुळे मंदिरातही असं कुणीच नव्हतं. त्यामुळे सर्वात आधी आपण गडावरून येऊ अशी सूचना त्याने सगळ्यांना दिली.

गेटपाशी जाताच तो बोर्ड शिंदेने वाचला की मास मटण दारू सेवन करणारा व मासिक पाळी असलेल्या महिलांनी गडावर प्रवेश करू नये. शिंदेला वाचताना बघुन राठोड त्यावर खेकसलाच... आणि म्हणाला शिंदे... अशा नियमांना काय करतोस ?येथे कोणते देव बसलेत?चला काय ते नियम वाचायला बसलेत. लय बघितलं असे नियम.. माणूस नियम बनवतोस कशासाठी.. तोडण्यासाठी... चला..

असे म्हणून गडाची वाटचाल करण्यास त्यांनी सुरुवात केली. दम घेत पाणी पीत मजल-दरमजल करीत त्यांनी पायथ्याचा टप्पा गाठला. आणि जलकुंभाजवळ येऊन थोडावेळ बसले. अचानक त्यांना कशाचा तरी गुरगुरण्याचा आवाज आला. गडावर जायच्या वाटेवरुन एक वाघ त्यांच्याकडे येत होता व जलकुंभाच्या बाजूने एक अस्वल पण इकडे येताना दिसत होती.

राठोडने इकडे तिकडे बघितले. कधी वाघाकडे तर कधी अस्वलाकडे. पण एक मात्र होतं, वाघ आणि अस्वल जवळ जवळ

येऊन त्यांच्यात वाद नव्हता. कारण कित्येकदा राठोडने असं बघितलं होतं की वाघ आणि अस्वल कधीच एक सोबत नसतात. पण येथे दोघांनाही सामोरी पाहून तो घाबरला होता. आणि उंचावर असलेल्या दगडावर चढून बसला, पण त्या जनावरांची नजर मात्र त्यांच्यावर येऊन होती. काय करावं? त्यांच्या चेहऱ्यावरून फक्त घामाचे ओघळ निघत होते. आता कदाचित आपले श्वास केव्हाही बंद पडू शकते याची त्यांना जाणीव झाली. राठोड तर खूपच घाबरुन गेला होता. आता वाट बघण्याशिवाय काहीच पर्याय नव्हता. शेवटी वाघाने एक डरकाळी मारली आणि सगळ्यांची भीतीने गाळण उडाली. कारण संबंध रानात ती काही बऱ्यापैकी गाजली होती. आता आपलं काही खरं नाही हे त्याने जाणले. आणि कमरेच्या बॉक्समधून त्याने पिस्तूल बाहेर काढले.

सगळ्यांना एक सोबत पळून जाण्याचा संकेत दिला. आणि हवेत त्याने गोळीबार केला. पण इतका आवाज होऊनही वाघही जागचं हलेना आणि अस्वलही जागची हलेना. एक-दोन-तीन अशा वरच्यावर त्याने गोळ्या झाडल्या पण कुणाला काहीच फरक झाला नाही. आता मात्र राठोडला कळून चुकलं होतं. की आपलं काही खरं नाही. कारण आता जवळ काहीच साधन पण नव्हतं.

बंदुकीमधल्या गोळ्या पण संपायला आल्या होत्या. आता पळ काढण्याशिवाय काहीच मार्ग नव्हते. पण वाटेवरच अगदी वाघ बसून होता. आणि तिकडे जंगलात पळावे म्हटलं तर अस्वल वाटेवर बसून होती. त्यामुळे कुणाकडे जावं हाही प्रश्न होता. आणि तिथून गड चढणे काही प्रत्येकाला जमले नसते. वेळ मात्र भीतीने निघून जात होती. अचानक कानाशी काहीतरी गुणगुणण्याचा आवाज तीव्रतेने येत होता.

सगळ्यांनी मान उंचावून डोळे उघडून वर बघितले तर गडावरुन मधमाशांचे थवेचे थवे त्यांना त्यांच्या अंगावर येतांना दिसले. यावेळेस मात्र राठोडची घाबरगुंडी उडाली. सोबत असणाऱ्या शिंदे आणि इतर जणांची सुद्धा, आता काही पर्याय नाही असे समजून दगडावरून खाली उतरले. आणि दोन्ही हातांनी मधमाशांना हाकलत गडाच्या खाली उतरू लागले. वाटेवरच्या वाघाला भ्यायचं काही त्यांच्या मनात आलं नाही. फक्त जीव वाचवण्याच्या नादात पळापळ करू लागले.

परत एकदा वाघाने जोरदार अशी आरोळी ठोकली. जंगल दणाणून गेलं होतं. सगळ्यांची धावपळ चालू होती. कुणी दगदावरून घसरून पडत होते, तर कोणी वाटेत येणाऱ्या झाडांना

जाऊन आदड आपट होत होते. पण प्रत्येकाला घाई होती आपलं जीव वाचवण्याची. त्यामुळे कुणीच कुणाला ऑर्डर देत नव्हते. आणि कुणीच कुणासाठी थांबतसुद्धा नव्हते. शेवटी कुठेही न थांबता धावतच राहिले. राठोडला तर आयुष्यात ट्रेनिंग मध्ये पण इतकं धावणे आठवत नव्हतं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दरदरून फुटलेला घाम भीतीची जाणीव करून देत होता. गडावर जाणाऱ्या गेटला ओलांडून ते मंदिराच्या मोकळया मैदानात आले, आणि उघड्यावरच जमिनीवर लोळत धापा टाकत बसले.

एव्हाना इतक्या पर्यंत मंदिरात असलेला तो गृहस्थ पिण्याच्या पाण्यासाठी गावाकडे पायपीट करत गेला होता. नुकताच पोहोचला होता. आणि अशा पद्धतीने पोलिसांना बघून तो त्यांच्या जवळ आला. प्रत्येकांचे चेहरे मधमाशांनी चावून चावून सुजवून टाकले होते. जिथे तिथे पडल्यामुळे पायाचे गुडघे खरचटले होते. तर कुणाचे हात पाय वगैरे त्याच प्रमाणात गंभीर झाले होते. त्या गृहस्थाला त्यांची दया आली व त्याने उचलून त्यांना पाणी वगैरे पाजले. मुळात कारण काय आहे? हे आधीच त्याने जाणून घेतलं होतं.

पाणी वगैरे पिऊन थोड्या वेळाच्या मोकळया उसास्याने त्यांना थोडी तरतरी आली. राठोड उठले आणि त्यांनी त्या सूचना फलकाकडे बघितले. तो गृहस्थ त्यांच्याकडे गेला व म्हणाला. साहेब चुकी लोक करतात. विसरून जातात की ईथे राजकारण चालत नाही, उच्च-नीच भेदभाव काही चालत नाही, इथे फक्त श्रद्धा चालते आणि श्रध्देचे नियम आहेत. आपण एक निसर्गाचे घटक असून सुद्धा बघा ना निसर्गात आणि आपल्यात किती फरक आहे. जेव्हा आपण प्रत्येकाला बघतो पण या दृष्टीने, पण आस्वाद घ्यायचं असल्यास त्यांच्या मनाप्रमाणे आपण वागतो काय? काय त्यांना थोडीशी तडजोड, ती पण आपल्याच समाधानासाठी, पण आपण तर तेही त्यांना देऊ शकत नाही.

इथे सगळं लिहून असल्यावरही माणसाचा अहंकार जागृत होतो. मग काय त्याची शिक्षा नको व्हायला? येथे कायदे नसतात साहेब, फक्त एक माया असते. आणि ज्याला ती कळते तोच गडावर जाऊन भक्ती करू शकतो. असे कितीतरी प्रसंग घडत असतात. आमच्यासाठी काही नवीन नाही हे.

राठोडला त्याची केलेली चूक फार प्रमाणात नडली होती. त्याची शिक्षा इतर लोकांनी पण भोगली होती. त्याला आता कळून

गेले होते की श्रद्धा म्हणजे काय असतं?त्याच्या जीवनात हा प्रसंग नेहमी एक आठवण बनून असणार होता. वाल्याचा वाल्मिकी झाला आहे असे त्यांनी ऐकले जरूर होते पण नास्तिकतेच्या थराला जाऊन आजपर्यंत त्याने कित्येक गोष्टींचा विरोध केला हे आता त्याला पटायला लागले होते.

मग त्याने नेमकं आता काय घडलं याची इत्यंभूत माहिती सगळी त्या गृहस्थाला सांगितली. आणि केलेल्या गैरवर्तनाबद्दल तो पश्चाताप व्यक्त करू लागला. त्यामुळे तो त्यांना म्हणाला,

"आता पश्चाताप करून काही उपयोग नाही साहेब. कारण तुम्ही शिक्षेस पात्र झालात. आणि त्यामुळे जर तुम्हाला माफी मागायची आहे तर त्या गडाची मागा. ज्याचे निवासी तुम्ही अवहेलना केली. उद्या कोणत्याही वाईट गोष्टीचे सेवन न करता चांगल्या प्रकारे या गडावर, मनात कसली भीती न घेता. आता निघा तुम्ही... नाही तर हे जंगल तुम्हाला अजून खायला उठेल.

गाडीत बसून येताना इन्स्पेक्टर राठोड बऱ्याच प्रमाणात विस्तारले होते. माझ्या प्रत्येक गोष्टीत त्यांना एक प्रकारचं खरं रूप डोळ्यासमोर दिसत होतं. ज्यामुळे आभास काय असते? किंवा अस्तित्व काय असते? याचा आज त्यांनी अभ्यास केला होता.

प्रत्येक बाबतीत आता बारकाईने बघत होते एव्हाना घरी जाण्यापेक्षा त्यांनी पोलिस स्टेशनची आधी भेट घेतली. आणि परत सगळे फाईल चेक करू लागले. माझ्या मित्रांच्या किंवा त्यांचे व्हिडिओ रिपिट करून करून बघत होते. त्यामुळे त्यांना अस्तित्वाची जाणीव होत होती.

हे सगळं चल-बिचल चालू असताना. एक अचानक त्यांच्या मनात पाल चुकचुकली. आज त्यांनी मला विसरून जाण्याची खंत व्यक्त केली आणि ताबडतोब गाडी काढून हॉस्पिटलकडे लावली. जाताना नेहमीसारखंच आवाज मात्र येत नव्हतं. कारण मधमाश्यांच्या हल्ल्यात वाटेवर घसरून पडल्यामुळे पायाला जराशी दुखापत झाली होती. आणि दोन-तीन जागी थोडं सुजन होती. त्यामुळे थोडा बंडेज लावलं होतं. बाकी तोच दरारा होता. आता फक्त सल्ले मात्र बदलले होते. त्याची गुणवत्ता थोड्याफार प्रमाणात घसरली होती.

पॅरानॉर्मल ॲक्टिव्हीटीचा एक प्रकार आहे असं त्यांना वाटू लागलं होतं. नेहमीसारखे दोन शिपाई दरवाजावर ठेवले होते. सलामी म्हणून त्यांनी साहेबांचं एक आदर्श ठेवलं.

कुणी आलं होतं का रे मीडिया वगैरे?

शिपाई = नाही साहेब.

राठोड = ठीक आहे... ठीक आहे.... जा कामावर....

असं म्हणून त्यांनी आत प्रवेश केला. तर माझ्या शेजारी नेहमीप्रमाणे रितू बसलेली त्यांना आढळली पण साहेबांची ही अवस्था बघून तिला थोडी चिंता आली.

काय झालं सर... तुमची अवस्था अशी कशामुळे झाली..

नियम तोडण्याचे दुष्कृत्य केले मी आज.. ज्यामुळे आज मला ही शिक्षा मिळाली.

नियम म्हणजे मी काही समजलं नाही सर.

मग राठोडने काही वेळापूर्वी झालेला पूर्ण वृत्तांत रितूसमोर कथन केला. ज्यामुळे रितू परत एकदा विवंचनेत पडली. कारण ज्या रस्त्याच्या शोधाअंती ती होती. अजूनही ती तितक्याच दूर उभी

होती, जीतक्यात ती आजपर्यंत होती. या प्रसंगामुळे तिलाही मात्र हे नक्की कळलं होतं की हे काही साधंसुध प्रसंग नाही आहे.

इतक्यात सूर्या हॉस्पिटलचे प्रमुख डॉक्टर सहारे येऊन गेले होते.

राठोड = काय म्हणाले ते?

रितू = काही महिन्यांपूर्वी त्यांच्याकडे पण असाच एक पेशंट होता त्याची सुद्धा हीच परिस्थिती होती. रोज त्याच्या पाठीवर वळ असायची.

राठोड = काय नाव काय म्हणालात ते त्याचं?

रितू = नाव आठवत नाही पण रुग्ण स्वतः हॉस्पिटल मधून निघून गेला होता. आणि त्याच्या आधाराला पण कोणीच नव्हते. त्यांनी त्याला शोधायचा प्रयत्न केला पण तो रुग्ण मग त्यांना मिळालाच नाही. काही वेळापूर्वी हि केससुद्धा अगदी त्यांच्यासारखीच आहे असं म्हणाले ते.

राठोड = अच्छा आणखी काही म्हणाले, शुद्धीवर वगैरे केव्हा येईल म्हणून.

रितू = हा नमन देसाई असे त्या रुग्णाचे नाव..

राठोड =काय नाव म्हटलं?

रितू = नमन देसाई

राठोड = कसा असू शकतो... तो तर केव्हाच मृत्यू पावला. त्याची केवढी मोठी खिंडार आजही सोशल मीडियावर गाजते आहे. तुला माहिती नाही का नमन हा पवनचाच मित्र होता. त्याची बॉडी माझ्यापाशीच पोलीस चौकीत होती. स्वतःहून पवनच तर तो न्यायला आला होता. बरं ते जाऊदे रात्री पुन्हा काही झालं होतं का म्हणजे परत वार वगैरे झालेत काय.

हा प्रश्न रितूसाठी तसा गरजेचा होताच. पण एकाकी वातावरणात अश्रुंचे ढग जमा व्हायला वेळ लागला नाही. कारण परिस्थिती अजून तरी कायम तशीच होती. काही फरक त्यामध्ये पडला नव्हता.

काल सायंकाळच्या सुमारास आई निघून गेली होती. आणि रितू माझ्या जवळ एकटीच उभी होती. रोज होणारे चाबकाचे फटके त्यामुळे रितू कधीच झोपत नव्हती, अगदी छोट्या-छोट्या हालचालीमुळे सुद्धा तिला जाग यायची. आणि माझं रोज तिळतिळ मरणं ही सुद्धा तिच्या जीवाची एक तितकीच खंत होती. सकाळी झालेल्या आवाजामुळे तिला जाग आली. थोड्याफार प्रमाणात प्रतिकार करायची तीव्रता तिच्या अंगी होती आणि माझ्यासाठी म्हणजे तिला मी सर्वस्व होतो.

अगदी सकाळी तिचे आई वडील आले होते. माझी भेट घेऊन तिला परत न्यायला. पण ती तिच्या वडिलांना म्हणाली.. अख्खं जग सोडून त्याच्याच मागे धावण्याचं सौभाग्य माझं. प्रत्येक वेळी मंगळसूत्र टाकून निभवता नाही येत. त्यासाठी सहवास तितकाच महत्त्वाचा असतो बाबा. आणि आयुष्यातील माझी वाट त्याच्याच पायापर्यंत येऊन थांबते. या वेळात जरी मी त्याच्यापासून लांब झाले तर काय अर्थ उरेल माझ्या नात्याला. मला स्वार्थी नाही व्हायचं बाबा. कधीच नाही. इतकं प्रेम दिले त्याने मला, कदाचित स्वतःला जोपासण्यासाठी त्याने ठेवलंय मला. तुम्हीच सांगा बाबा कसं सोडू त्याला. माझ्यापर्यंत काळाची नजर येऊ नये म्हणून

आधीच त्याने मला खूप वेळा टाळलं आहे. रोज तडफडतो माझ्याशी बोलण्यासाठी आणि अशा वेळेला तुम्ही म्हणता मी त्याला सोडून जाऊ. अहो बाबा आता तर आयुष्य हरवले त्याच्यात. त्याचं नुसतं श्वास जरी चालू असेल ना तरी इथे माझं श्वास चालते. कारण मी ठरवलंय, आता घरी येणार तर त्याला घेऊनच नाहीतर जाणार तर त्याच्या सोबतच.

खरंच आई-वडिलांचे तिच्या डोळे पाणावले. शेवटी मुलीच्या त्या अनोख्या संसाराला डोळे टिपत आणि प्रणाम करत निघून गेले. शेवटी आईवडीलच ते, मुलीच्या सुखाचाच स्वार्थ करतील. कारण तसे न केल्यास त्यांना आई-वडील होण्याचा अधिकारच कोणता?. शेवटी मुली जवळ ते एकच बोलू शकले, "शहाणी झाली हा माझी बाळ... आज वडिलांना शिकवते ... सुखाने रहा गं.. माझी पोर... आणि खात्री करतो की तू लवकर यावं. आणि त्याला घेऊन यावं. येतो आम्ही काळजी घे.. आणि काही लागलं असल्यास कळव आम्हाला. '

हे नाते किती विचित्र असतात. सख्ख्याना कदर नसते आणि परके नाते जीवसुद्धा ओवाळून टाकतात. दृष्टांत मांडला तर आपल्या सख्ख्याना मागे टाकतील अशी त्यांची स्थिती असते.

नशीबवान होतो मी बेडवर लेटुन असताना देखील कितीतरी मनांच्यावर राज्य करत होतो. आणि तेही एकदम आपुलकीनं, विश्वासानं आणि प्रेमानं.

रात्रीला तसं यावेळी सगळे तयार होते. कारण दरवेळेस रात्रीला कसले भयानक कृत्य चालते हे सगळ्यांना हॉस्पिटलमध्ये माहीत होऊन गेलं होतं. रितू मघापासून दंडावर बांधून असलेल्या ताईतावर नजर ठेवून बसली होती. कारण तिला त्यावर विश्वास वाटत होता.

रात्रीचा तो सुमार चालू झाला. रितू बेडच्या आसपास येरझारा घालू लागली होती. प्रत्येक सेकंदामागे तिची नजर माझ्यावर पडत होती. कारण मृत्यू कोणत्याही वेळी आता माझ्या मागावर येऊ शकत होता. गेले काही दिवस तिने याची पूर्तता केली होती. कुठेतरी बाहेर नर्सची कुजबुज ऐकू येत होती. याचा अर्थ अजून बरेच जण जागे होऊन हॉस्पिटलमध्ये वाट बघत होते. दारावर असलेले राठोडचे पहारेकरी केव्हाच निद्रेच्या स्वाधीन झाले होते. फक्त एक रितुच काळजीच्या स्वराने गुंतलेली माझ्यासाठी रात्र जागत होती.

अचानक वातावरणात कसलासा बदल होऊ लागला. रितूने ओळखले की आता मृत्यूचे सावट माझ्या अंगावर यायला लागले आहेत. ती कसलाही विचार न करता माझ्याजवळ आली. ऑक्सिजन मास्क माझा चेक करून बघितला . जिकडेतिकडे त्रुटी आहे का नाही एक शोधक नजर टाकली. आणि चादर व्यवस्थित छातीपर्यंत पांघरली. व बेडपाशी एक खुर्ची लावून माझ्यापाशी येऊन विसावली.

कसल्याशा भासाने तिने कान टवकारले आणि मान उंचावली. गेट पासून काही अंतरावर एक हालचाल तिच्या दृष्टीस पडली. एक पुसटशी सावली हळूहळू माझ्या बेडकडे सरकत होती. पण या वेळेस एक विचित्र हास्य रितूच्या कानावर येत होते. अगदी स्पष्ट....... हा ... हा ... हा.. हा .. हा...

अगदी थोड्याच अंतरावर येऊन ती सावली उभी झाली. आणि एका कडक वाणीच्या स्वरूपात म्हणाली, सोडणार नाही तुला... तुला नेणार म्हणजे नेणारच .... अजून किती दिवस राहशील ... आज निश्चितच... पण सोडणार नाही... नेणारच तुला ..... आणि चाबकाचा सड... असा आवाज हवेत भिरकावला.

रितूला आज स्पष्टपणे ऐकायला येत होते. मी आहे तोपर्यंत त्याला कधीच जाऊ देणार नाही. असं म्हणून ती त्या सावलीला आडवी झाली. पुन्हा एकदा तोच भयानक हसण्याचा आवाज कानात भिरकाव करू लागला. शेवटी ती सावली चालता-चालता केव्हा तिच्या आरपार झाली तिला कळलेच नाही. ती सावली जाऊन माझ्या छातीवर उभी झाली. आणि परत एकदा चाबूक हवेत भिरकावला.

आता काय घडणार आहे हे रितुला निश्चितच माहित होतं. ती परत माझ्याकडे आली. त्या सावलीला म्हणाली... सोड त्याला... हवं तर मला ने, पण सोड त्याला... पण ती सावली माझ्या शरीरावरून उठायचं नाव घेत नव्हती. आणि मग त्याने ते फटके मारण्यास सुरुवात केली. पण काय आश्चर्य? यावेळेस एकही फटका माझ्या शरीरावर पडत नव्हता. चाबकाचे सगळे वार असे खाली जात होते.

रितू हे सगळं बाजूलाच उभी होऊन बघत होती. कारण ठरल्याप्रमाणे तिचा विश्वास जिंकला होता. डॉक्टरने तो ताईत काढल्यानंतर रीतूने तो ताईत आपल्या हाताने परत बांधला होता. माझा एक विश्वास म्हणून तिने तेवढी एक खून माझ्या दंडावर ठेवली

होती. शेवटी ती सावली त्रासली आणि सभोवार नजर टाकत असताना त्याने माझ्या हातावर असलेल्या ताईतकडे बघितलं. आणि नकळत ती सावली माझ्या छाती वरून खाली उतरली. माझ्या पुढ्यात उभे होऊन एक भयानक हास्य गाजवू लागली.

हा.... हा... हा.. हा.. हा....... त्याचं भयानक हास्य संपूर्ण हॉस्पिटल गर्जवणारे होते. आणि म्हणाला.. तुला काय वाटतं? तू त्याला वाचवू शकणार. अगं जीव त्याचा इथं नाही... तो अडकलाय. आता तिथून त्याची सुटका कधीच नाही. हा ... हा... हा... हा... हा... ह... हा... निघू दे त्याला केव्हाही. पण मी परत येणार.. त्याला नेणार.

आभाळ गरजल्यासारखे त्याचे शब्द तिच्या कानात गुंजत होते. आणि ती सावली परत एकदा माझ्यातून आरपार झाली. आणि बघताबघता दिसेनाशी झाली. त्या ताईतनं मला वाचवलं जरूर होतं. पण मी शेवटी होतो कुठे?कुठे अडकलो होतो?

रितू माझ्यापाशी निश्चलपणे बसून होती. कारण आता तिला स्वतःबद्दल एक किळस येऊ लागली होती. डोळे बंद करून मनात एक निश्चय करत होती. आता आपण पवनला आणायचे म्हणजे

आणायचं ... जगाच्या कोणत्याच कोपऱ्याला जरी तो अडकला असेल तरी आपण त्याला आणायचं.

तर मित्रांनो आतापर्यंत बऱ्याच प्रमाणात आपण पवनची कथा वाचली. पण बेडवर पडून असतानासुद्धा पवन होता कुठे? तुम्हालाही प्रश्न पडला असेल नाही का? रितूने मनाशी काय निश्चय केला? इन्स्पेक्टर राठोडला खरंच पवनशी निगडित असलेल्या रहस्यांचा शोध लागेल काय? तर बघूया पुढील भागात पण तत्पूर्वी "पेरजागढ भाग एक" आणि "पेरजागढ भाग दोन" चा रिप्लाय मला कळवा. कारण समोर येणारी पुस्तक कदाचित आणखी एक वेगळं वळण घेऊ शकते.

प्रतिसाद द्या... आणि कळवा..

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.**

**कार्तिक हजारे यांचं ई साहित्यवरचं हे पाचवं  पुस्तक.**

कार्तिक हजारे चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागातील एक युवक. परिस्थितीच्या निखाऱ्यांनी त्यांच्यातील लेखकाला करपवण्याचा खूप प्रयत्न केला. त्यातून त्यांची शैली आणि भाषा पुण्यामुंबईच्या अभिजनवर्गापासून वेगळी. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये आशयाची ताकद आणि अभिव्यक्तीमध्ये ठोस मांडणी असूनही त्यांच्या साहित्याला म्हणावा तसा प्रतिसाद मिळात नव्हता. त्यांनीच म्हटाले आहे की लिहीण्यापेक्षा जास्त टेन्शन येते ते लिहीलेले दुसऱ्याला दाखवण्यात. पण ई साहित्यवर त्यांची पहिली तीन पुस्तकं गाजली, वाचकांनी वाखाणली तेव्हा मात्र त्यांना हुरूप आला.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर

लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे,

सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, प्रतिक म्हात्रे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत.

ही नवीन लेखकांची दमदार फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान